220

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

आदिवासी जनहिताय

आदिवासी विकास विभाग

# तेलपंप/एच.डी.पी.ई. पाईप्स पुरवठा मूल्यमापन अहवाल





TRTI


आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,

२८, क्वीन्स गार्डन,

महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३६२०७१, फॅक्स क्र. ०२०-२६३६००२६

Email - trti.mah@nic.in

# तेलपंप / एच.डी.पी.ई.
# पाईप्स पुरवठा
## मूल्यमापन अहवाल

# प्रस्तावना

आदिवासी जमातीचे शेतकरी हे शेतीवर व शेतमजुरीवर जीवन जगत असतात. शेती असलेल्या शेतकऱ्यांना सिंचनाची सोय उपलब्ध करुन देणे, पाण्याचा उपसा करण्यासाठी वीजपंप / तेलपंप उपलब्ध करुन देणे, तसेच दारिद्र्यरेषेखालील शेतकऱ्यांना एच.डी.पी.ई. पाईपचा पुरवठा करणे, या योजना राज्यशासनाकडून राबविण्यात येतात. तसेच केंद्र शासनाकडून विशेष केंद्रीय साहाय्य योजनेंतर्गत वैयक्तिक लाभाच्या अनेक योजना अतिरिक्त निधी देवून राबविण्यात येतात. केंद्र व राज्य या दोन्ही योजनेतून तेलपंप पुरवठा ही योजना राबविण्यात येते.

मा. अध्यक्ष, अनुसूचित जाती जमाती आयोग, यांचे अध्यक्षतेखाली नाशिक येथे दिनांक ५ मार्च २०१० रोजी बैठक झाली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्तामध्ये असे नमूद करण्यात आले होते की, ज्या आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप / तेलपंप तसेच एच.डी.पी.ई. पाईपचा पुरवठा करण्यात आला आहे, अशा आदिवासी लाभार्थी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली किंवा कसे, याकरिता आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आदिवासी प्रकल्पांमधील काही गावांची निवड करून मूल्यमापन करावे व या योजनेच्या यशस्वीतेची माहितीपुस्तिका तयार करावी. त्याप्रमाणे या योजनेची निवड मूल्यमापनाकरिता करण्यात येऊन पाहणी करण्यात आली आहे.

सर्वेक्षणातंर्गत कुटुंबपत्रकात भरलेल्या माहितीचे संगणकीकरण व पृथःकरणाचे काम या संस्थेतील एक्षेविका शाखेतील तत्कालीन श्री. के. एस. चव्हाण, उपसंचालक (एक्षेविका) व श्री. र. ल. कोल्हार, प्र. उपसंचालक (एक्षेविका ) यांनी अंतिम सर्वेक्षण अहवाल तयार करताना मार्गदर्शन केले. प्र. उपसंचालक (एक्षेविका ) यांच्या मार्गदर्शनाखाली संगणकीय माहितीवर आधारित तक्तीकरण व अंतिम अहवाल लिहिण्याचे काम श्री. आर. एस. जाधव, मुख्य लिपिक व श्री. योगेश चौधरी, अन्वेषक (व). यांनी केले.

हा मूल्यमापन पाहणी अहवाल, ही योजना राबविणारी प्रकल्प कार्यालये, या योजनेची आखणी व अंमलबजावणी करणारे अधिकारी, आदिवासी विकास विभागातील कर्मचारी, आयुक्त, आदिवासी विकास व इतर संबंधितांना उपयोगी पडेल, असे वाटते.

दिनांक : ३ /१२/२०१२
ठिकाण : पुणे

(सुधीर पाटील),
आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य , पुणे ४११ ००१.



वि (वाय) ६५१–१-अ

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १. | प्रस्तावना | -- | -- |
| २. | प्रकरण - १ - मूल्यमापनाचा उद्देश | १ | १ |
| ३. | प्रकरण - २ - मूल्यमापनाची कार्यपध्दती | २ | ४ |
| ४. | प्रकरण - ३ - पृथ:करण | ५ | २० |
| ५. | प्रकरण - ४ - निकष / निष्कर्ष व शिफारशी | २१ | २४ |
| ६. | परिशिष्ट -अ - शासन निर्णय व माहितीपत्रकाचा नमुना | २५ | ४९ |

## प्रकरण -१

## मूल्यमापनाचा उद्देश

आदिवासी शेतकऱ्यांचा आर्थिक दर्जा उंचावण्यासाठी १००% अनुदानावर वीजपंप मंजूर केले जतात. या योजनेशी संलग्न योजना म्हणून आदिवासी शेतकऱ्यांना पी.व्ही.सी. पाईप ऐवजी एच.डी.पी.ई. पाईपचा पुरवठा करण्यात यावा. शासन निर्णय क्रमांक पी.व्ही.सी.-२००८./प्र.क्र.२६६/का-५, दिनांक २४ डिसेंबर २००८ सोबत जोडलेले आहे. सदरहू योजना २४ ऑगस्ट २००४ पासून राबविण्यात येत आहे.

आदिवासी शेतकऱ्यांना तेलपंप व एच.डी.पी.ई. पाईप्स पुरवठा या योजनेंतर्गत पुरविण्यात आलेला तेलपंप व एच.डी.पी.ई. पाईप्स प्रत्यक्षात लाभार्थी शेतकऱ्याला उपलब्ध झाले का ? तो तेलपंप व एच.डी.पी.ई. पाईप्स कार्यान्वित आहेत का ? ही योजना राबविण्यातील अडचणी काय आहेत ? हे पाहण्यासाठी तेलपंप व एच.डी.पी.ई. पाईप्स वाटप या योजनेची मूल्यमापन पाहणी करण्यासाठी खालील उद्देश निश्चित करण्यात आले आहेत.

१. शासनाने निश्चित केलेले या योजनेचे उद्देश साध्य झालेत का ?
२. ही योजना राबविण्यामध्ये काय अडचणी आहेत ?
३. या योजनेमध्ये काय सुधारणा करणे आवश्यक आहे ?

## प्रकरण - २

# मूल्यमापनाची कार्यपध्दती

तेलपंप व एच.डी.पी.ई. पाईप्स वाटप या योजनेचे मूल्यमापन करण्यासाठी एक प्रश्नावली तयार करण्यात आली होती. या प्रश्नावलीमध्ये कुटुंबाची वैयक्तिक माहिती, कुटुंबाचा मुख्य व दुय्यम व्यवसाय, कुटुंबाने धारण केलेले जमिनीचे क्षेत्र, पशुधन, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न त्याचबरोबर कुटुंब प्रमुखाचे शिक्षण व त्यांची जमात इत्यादी माहिती गोळा करण्यात आली आहे.

आदिवासी शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर तेलपंप वाटप ही योजना संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येत असल्यामुळे या योजनेचे लाभार्थी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये आहेत. तथापि, दारिद्र्यरेषेखाली नाव असणाऱ्या शेतकऱ्यांनाच फक्त एच.डी.पी.ई. पाईप्स वाटप करण्यात येतात. या योजनेचे लाभार्थी तेलपंप वाटप या योजनेप्रमाणेच महाराष्ट्रभर आहेत. या पाहणीसाठी खालील प्रकल्प कार्यालयांची निवड करण्यात आली.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. डहाणू | २. शहापूर | ३. घोडेगाव | ४. नाशिक | ५. कळवण |
| ६. राजूर | ७. देवरी | ८. नागपूर | ९. किनवट | १०. पांढरकवडा |

या १० प्रकल्प कार्यालयांमध्ये मूल्यमापनाचे काम सन २०१०-११ मध्ये करण्यात आलेले आहे.

क्षेत्रीय पाहणीचे काम करण्यासाठी या कार्यालयातील दोन अधिकाऱ्यांची दोन पथके तयार करण्यात आली. प्रत्येक पथकामध्ये एक अधिकारी, एक संशोधन सहायक व एक अन्वेषक / वरिष्ठ लिपिक यांचा समावेश होता. प्रत्येक पथकास ४ ते ६ प्रकल्प कार्यालये मूल्यमापन पाहणीसाठी देण्यात आली होती. तेलपंप व एच.डी.पी.ई. पाईप वाटप योजनेची माहिती संबंधित प्रकल्प कार्यालय प्रमुखाशी चर्चा करून घेण्यात आलेली आहे.

प्रत्येक पथकास देण्यात आलेली प्रकल्प कार्यालये व त्या पथकाने भरलेली पत्रके याची माहिती खालीलप्रमाणे आहे :--

| अ.क्र. | पथक प्रमुखाचे नाव | जिल्ह्याचे नाव | प्रकल्प कार्यालय | तालुक्याचे नाव | गावांची संख्या | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. पी. बी. यादव, (उपसंचालक)<br>**पथकातील इतर सदस्य**<br>(१) श्री. एस. एम. यादव (संशोधन अधिकारी)<br>(२) श्री. ए. टी. पाटणकर (संशोधन सहायक) | पुणे | घोडेगाव | आंबेगाव | १८ | १८ |
| | | | | जुन्नर | ३ | ११ |
| | | | | खेड | १६ | १६ |
| | | अहमदनगर | राजूर | अकोले | ८ | ३० |
| | | | | संगमनेर | ३ | १३ |
| | | गोंदिया | देवरी | देवरी | २९ | ५४ |
| | | नागपूर | नागपूर | रामटेक | १३ | ४८ |
| | | नांदेड | किनवट | किनवट | ६ | ३२ |
| | | | | हिमायतनगर | ३ | ११ |
| | | यवतमाळ | पांढरकवडा | घाटंजी | ८ | २५ |
| | | | | केळापूर | ४ | १६ |
| २ | श्रीमती. ए. एस. काळे (संशोधन अधिकारी)<br>**पथकातील इतर सदस्य**<br>(१) श्री. यु. एम. यादव (आरेखक)<br>(२) श्री. योगेश चौधरी [अन्वेषक (व.)] | ठाणे | डहाणू | डहाणू | २ | १२ |
| | | | | तलासरी | ३ | १५ |
| | | | | पालघर | १ | ९ |
| | | | शहापूर | शहापूर | ५ | १८ |
| | | | | मुरबाड | १ | ९ |
| | | नाशिक | नाशिक | त्र्यंबकेश्वर | ४ | १८ |
| | | | | नाशिक | २ | १६ |
| | | | | इगतपूरी | १ | ७ |
| | | | कळवण | कळवण | २ | ४७ |
| | एकूण | ०८ | १० | २० | १३२ | ४२५ |

या मूल्यमापनाचे काम एकूण ०८ जिल्ह्यांमधील १० प्रकल्पांमध्ये करण्यात आले आहे. या १० प्रकल्पांमध्ये एकूण २० तालुके असून १३२ गावांचा समावेश आहे. या १३२ गावांमध्ये एकूण ४२५ लाभार्थ्यांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचेकडून या योजनेबाबतची माहिती प्रपत्राद्वारे संकलीत करण्यात आली. सदर माहितीचे पृथ:करण करून याबाबत मूल्यमापन करण्यात आले आहे. याबाबतचा शासन निर्णय व माहिती पत्रकाचा नमुना शेवटी परिशिष्ट -अ मध्ये जोडला आहे.

**सन २०१०-११ मध्ये केलेल्या मूल्यमापन पाहणीनुसार अनुसूचित जमातनिहाय लाभार्थ्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-**

| अ. क्र. | जिल्हा | प्रकल्प | तालुका | जमातीचे नाव | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे | घोडेगाव | आंबेगाव | महादेव कोळी | १८ |
| | | | जुन्नर | महादेव कोळी | ११ |
| | | | खेड | महादेव कोळी | १५ |
| | | | | ठाकर | ०१ |
| २ | अहमदनगर | राजूर | अकोले | महादेव कोळी | २९ |
| | | | संगमनेर | महादेव कोळी | १२ |
| | | | | भिल | ०१ |
| | | | | ठाकर | ०१ |
| ३ | गोंदिया | देवरी | देवरी | गोंड | २८ |
| | | | | हलबी | २४ |
| | | | | माना | ०२ |
| ४ | नागपूर | नागपूर | रामटेक | गोंड | ४८ |
| ५ | नांदेड | किनवट | किनवट | आंध | २८ |
| | | | | परधान | ०२ |
| | | | | गोंड | ०२ |
| | | | हिमायतनगर | आंध | ११ |
| ६ | यवतमाळ | पांढरकवडा | घाटंजी | गोंड | १९ |
| | | | | कोलाम | ०६ |
| | | | केळापूर | गोंड | ०१ |
| | | | | परधान | १३ |
| | | | | कोलाम | ०२ |
| ७ | ठाणे | डहाणू | डहाणू | कातकरी | ०८ |
| | | | | वारली | ०३ |
| | | | | मल्हार कोळी | ०१ |
| | | | तलासरी | कातकरी | ० |
| | | | | वारली | १५ |
| | | | | मल्हार कोळी | ० |
| | | | पालघर | कातकरी | ० |
| | | | | वारली | ०८ |
| | | | | मल्हार कोळी | ०१ |

| अ. क्र. | जिल्हा | प्रकल्प | तालुका | जमातीचे नाव | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ८ | ठाणे | शहापूर | शहापूर | ठाकर | १२ |
| | | | | म. ठाकूर | ०३ |
| | | | | कातकरी | ०३ |
| | | | मुरबाड | म. ठाकूर | ०३ |
| | | | | म. कोळी | ०६ |
| ९ | नाशिक | नाशिक | त्र्यंबकेश्वर | कोकणा | ०८ |
| | | | | महादेव कोळी | ०९ |
| | | | नाशिक | कोकणा | ०८ |
| | | | | महादेव कोळी | १० |
| | | | इगतपुरी | कोकणा | ० |
| | | | | महादेव कोळी | ०६ |
| | | कळवण | कळवण | कोकणा | ४५ |
| | | | | महादेव कोळी | ०२ |
| | | | | एकूण | ४२५ |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, पुणे व अहमदनगर जिल्ह्यांमध्ये महादेव कोळी, गोंदिया जिल्ह्यामध्ये गोंड व हलबी, नागपूर जिल्ह्यामध्ये गोंड व आंध, नांदेड जिल्ह्यात आंध, यवतमाळ जिल्ह्यामध्ये गोंड व कोलाम, ठाणे जिल्ह्यातील डहाणू प्रकल्पामध्ये वारली व कातकरी, शहापूर प्रकल्पात ठाकर व म. ठाकूर, आणि नाशिक जिल्ह्यामध्ये कोकणा व महादेव कोळी या अनुसूचित जमातीचे लाभार्थींचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते.


## प्रकरण - ३

## पृथ:करण

लाभ घेतलेल्या लाभार्थींची लिंगानुसार (पुरुष व स्त्री) वर्गीकरण पुढीलप्रमाणे :-- (संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | लाभार्थी संख्या | लिंगनिहाय | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्री | एकूण |
| १ | पुणे | ४५ | ४३ | ०२ | ४५ |
| २ | अहमदनगर | ४३ | २५ | १८ | ४३ |
| ३ | गोंदिया | ५४ | ४८ | ०६ | ५४ |
| ४ | नागपूर | ४८ | ३७ | ११ | ४८ |
| ५ | नांदेड | ४३ | ३६ | ०७ | ४३ |
| ६ | यवतमाळ | ४१ | ३० | ११ | ४१ |
| ७ | ठाणे | ६३ | ५३ | १० | ६३ |
| ८ | नाशिक | ८८ | ७८ | १० | ८८ |
| | एकूण | ४२५ | ३५० | ७५ | ४२५ |

एकूण ४२५ लाभार्थ्यांपैकी ३५० (८२ टक्के) पुरुष तर ७५ (१८ टक्के) स्त्रिया असल्याचे दिसून येते.



सन २०१०-११ मध्ये सर्वेक्षण करण्यात आलेल्या एकूण आठ जिल्ह्यांमधील शैक्षणिक माहिती पुढीलप्रमाणे आहे :--

(संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | निरक्षर | १ ली ते ४ थी | ५ वी ते ७ वी | ८ वी ते १० वी | ११ वी ते १२ वी | १२ वी ते पुढील | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे | १२ | ०८ | ०५ | १८ | ०१ | ०१ | ४५ |
| २ | अहमदनगर | १० | १७ | ०७ | ०३ | ०२ | ०४ | ४३ |
| ३ | गोंदिया | १२ | २२ | ०६ | ०८ | ०२ | ०४ | ५४ |
| ४ | नागपूर | १६ | १३ | ११ | ०२ | ०३ | ०३ | ४८ |
| ५ | नांदेड | १७ | ११ | ०५ | ०८ | ०० | ०२ | ४३ |
| ६ | यवतमाळ | १९ | १२ | ०५ | ०१ | ०४ | ०० | ४१ |
| ७ | ठाणे | ४२ | ०९ | ०६ | ०२ | ०१ | ०३ | ६३ |
| ८ | नाशिक | ६५ | ११ | ०५ | ०४ | ०२ | ०१ | ८८ |
| | एकूण | १९३ | १०३ | ५० | ४६ | १५ | १८ | ४२५ |


सर्वसाधारणपणे अनुसूचित जमातीचे लोक हे दऱ्या, डोंगरात म्हणजेच दुर्गम भागात वास्तव्यास असल्याने हा समाज शिक्षणापासून वंचित राहू नये, शिक्षणाशिवाय त्यांची सामाजिक, आर्थिक उन्नती होऊ शकणार नाही, हे ओळखून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची दुरदृष्टी ठेवून अनुसूचित जमातीचे लोक रहात असलेल्या डोंगराळ भागामध्ये आश्रमशाळांच्या रूपात शासनाने शैक्षणिक दालने उपलब्ध करून दिलेली आहेत. ज्यामध्ये अनुसूचित जमातीच्या मुलांना शिक्षण घेता येईल. अनुसूचित जमातीच्या लोकांची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याने आश्रमशाळेत शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या मुलांना आवश्यक असलेल्या सर्व शैक्षणिक सुविधा, राहण्याची सुविधा व जेवणाची सोय या सर्व बाबी शासनामार्फत मोफत केल्या जातात. मात्र वरीलप्रमाणे शैक्षणिक माहितीचे अवलोकन केले असता या ८ जिल्ह्यांमध्ये वास्तव्यास असलेल्या अनुसूचित जमातींची शैक्षणिकदृष्ट्या आवश्यक त्या प्रमाणात सुधारणा अल्प प्रमाणात असल्याचे दिसून येते. एकूण ४२५ लाभार्थींपैकी १९३ (४५%) लाभार्थी निरक्षर आहेत. १ ली ते ४ थी पर्यंत शिक्षण झालेले १०३ (२४%), ५ वी ते ७ वी पर्यंत शिक्षण झालेले ५० (१२%), ८ वी ते १० वी पर्यंत शिक्षण झालेले ४६ (११%) व उर्वरित लाभार्थी (८%) हे १० वी च्या पुढील शिक्षण घेतलेले आहेत.


लाभार्थ्यांचे वयोमानानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे :--

(संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | वयोमानानुसार वर्गीकरण | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ३० पर्यंत | ४५ पर्यंत | ६० पर्यंत | ६० च्या पुढे | |
| १ | पुणे | ०३ | १९ | १० | १३ | ४५ |
| २ | अहमदनगर | ० | २३ | १३ | ०७ | ४३ |
| ३ | गोंदिया | ०१ | २१ | २१ | ११ | ५४ |
| ४ | नागपूर | ०१ | १५ | २३ | ०९ | ४८ |
| ५ | नांदेड | १० | २० | १२ | ०१ | ४३ |
| ६ | यवतमाळ | ० | १६ | १६ | ०९ | ४१ |
| ७ | ठाणे | ०६ | २१ | २८ | ०८ | ६३ |
| ८ | नाशिक | १० | २४ | ३३ | २१ | ८८ |
| | एकूण | ३१ | १५९ | १५६ | ७९ | ४२५ |

अनुसूचित जमातीचे लोक हे दऱ्या, डोंगरात वास्तव्यास असून शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे. त्यांची शेती ही सर्वस्वी पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यांचेकडे उपलब्ध असलेले पाणी शेतीसाठी वापरल्यास त्यांची आर्थिक उन्नती होऊ शकते. मात्र त्यासाठी आवश्यक असलेले तेलपंप व पाईप्स खरेदी करण्याइतकी त्यांची आर्थिक परिस्थिती नाही. त्यांची आर्थिक स्थिती सुधारणेच्या दृष्टीने शासनाने अनुसूचित जमातीच्या लाभार्थींना तेलपंप पुरवठा व एच.डी.पी.ई. पाईप्स पुरवठा करण्याची योजना सुरू केली. वर निर्देशित केलेनुसार अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना तेलपंप व एच.डी.पी.ई. पाईप्सचा पुरवठा शासनामार्फत करण्यात आला आहे.





अनुसूचित जमातीच्या लाभार्थींना शासकीय योजनेतून देण्यात आलेल्या योजनांची माहिती खालीलप्रमाणे :--

(संख्या)

| अ. क्र. | जिल्हा | तेलपंप | एच.डी.पी.ई. पाईप्स | तेलपंप व पाईप | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे | १२ | ११ | २२ | ४५ |
| २ | अहमदनगर | १८ | २१ | ०४ | ४३ |
| ३ | गोंदिया | २१ | २९ | ०४ | ५४ |
| ४ | नागपूर | १४ | २५ | ०९ | ४८ |
| ५ | नांदेड | २० | २१ | ०२ | ४३ |
| ६ | यवतमाळ | १७ | ०९ | १५ | ४१ |
| ७ | ठाणे | ३५ | ०१ | २७ | ६३ |
| ८ | नाशिक | ३१ | १६ | ४१ | ८८ |
| . | एकूण | १६८ | १३३ | १२४ | ४२५ |

अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची आर्थिक उन्नती करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने शासनाने वरीलप्रमाणे योजनांचा लाभ अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना दिलेला असून तेलपंप लाभार्थी १६८, एच.डी.पी.ई. पाईप्स लाभार्थी १३३, तसेच तेलपंप / एच.डी.पी.ई. पाईप्स या दोन्ही योजनांचा लाभ घेतलेले १२४ लाभार्थी अशा एकूण ४२५ लाभार्थ्यांना शासकीय योजनेतून लाभ देण्यात आला आहे.



**अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांकडे स्वतःच्या मालकीची असलेल्या जमिनीची**

**जिल्हानिहाय माहिती**

(हेक्टर/आर)

| अ. क्र. | जिल्हा | लाभार्थी संख्या | लाभापूर्वी | | लाभानंतर | | वाढ झालेले बागायत क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जिरायत | बागायत | जिरायत | बागायत | |
| १ | पुणे | ४५ | ६०.०४ | ३८.०८ | ३३.०० | ६५.०८ | २७.०० |
| २ | अहमदनगर | ४३ | ८०.०० | ०.०० | ३४.७० | ४५.३० | ४५.३० |
| ३ | गोंदिया | ५४ | ६७.९९ | ०.०० | ०.०० | ६७.९९ | ६७.९९ |
| ४ | नागपूर | ४८ | १५४.५४ | २१.०० | १४६.७३ | २८.८१ | ०७.८१ |
| ५ | नांदेड | ४३ | ११६.८३ | २३.०७ | ९५.४२ | ४४.४८ | २१.४१ |
| ६ | यवतमाळ | ४१ | १००.७७ | ०.०० | ८.६२ | ९२.१५ | ९२.१५ |
| ७ | ठाणे | ६३ | ९८.९८ | २६.२४ | ६२.९३ | ३६.०५ | २.०० |
| ८ | नाशिक | ८८ | ८१.७५ | ९.१८ | ४९.५७ | ४१.३६ | ३२.१८ |
| | एकूण | ४२५ | ७६०.९ | ११७.५७ | ४३०.९७ | ४२१.२२ | २९५.८४ |

· वरीलप्रमाणे अवलोकन केले असता, लाभार्थ्यांकडे असलेली जिरायत जमीन क्षेत्र हेक्टर आर ही जमीन शासनाने अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांची शेती ओलिताखाली आणण्यासाठी त्यांना तेलपंप / एच.डी.पी.ई. पाईप्स यांचा पुरवठा केल्यामुळे वरीलप्रमाणे जिरायत जमिनीचे इतक्या क्षेत्राचे बागायतीमध्ये रुपांतर होऊन लाभार्थी भात / गहू या पारंपरिक पिकांव्यतिरिक्त हरभरा, कापूस, नागली / नाचणी व भाजीपाला अशी वेगवेगळी पिके घेऊ लागला असून शासनाने त्यांना दिलेल्या योजनांमुळे त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यात मदत झाल्याचे दिसून येते.

## अनुसूचित जमातीचे लाभार्थी शेतीमध्ये घेत असलेल्या पिकांची माहिती

### जिल्हानिहाय माहिती

(संख्या)

| अ. क्र. | प्रकल्प व जिल्हा | लाभार्थी संख्या | लाभापूर्वी | | | लाभानंतर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भात | नाचणी / लागली | हरभरा | भात | गहू | नाचणी / लागली | हरभरा | फरस बी |
| १ | घोडेगाव, जि. पुणे | ४५ | ४५ | ०४ | ०७ | ३८ | ३० | १० | २३ | ०२ |
| २ | देवरी, जि. गोंदिया | ५४ | ५४ | ०० | ०१ | ०८ | ०२ | ०३ | १४ | ०० |
| ३ | नागपूर, जि. नागपूर | ४८ | ४८ | ०० | १० | ४० | २९ | ०० | १६ | ०० |
| ४ | किनवट, जि. नांदेड | ४३ | ०६ | ०० | १६ | ०५ | ३१ | ०० | ३३ | ०० |
| ५ | पांढरकवडा, जि. यवतमाळ | ४१ | ०० | ०० | ०४ | ०० | १८ | ०० | २२ | ०० |
| ६ | शहापूर, जि. ठाणे | ६३ | २४ | ०० | ०० | २४ | ०० | ०० | ०० | ०० |
| | डहाणू, जि. ठाणे | | ३८ | ०६ | ०१ | ३५ | ०० | ०५ | ०१ | ०० |
| ७ | नाशिक, जि. नाशिक | ८८ | ४१ | २५ | ०१ | ३५ | २६ | ०५ | १७ | ०० |
| | कळवण, जि. नाशिक | | ४७ | २१ | ०५ | २६ | ४२ | ०३ | ४० | ०० |
| ८ | राजूर, जि. अहमदनगर | ४३ | ३९ | ०१ | ०० | ३३ | ३२ | ०४ | २२ | ०० |
| | **एकूण** | **४२५** | **३४२** | **५७** | **४५** | **२४४** | **२१०** | **३०** | **१८८** | **०२** |


वरील तक्त्याचे अवलोकन केले असता, लाभार्थी हा लाभ मिळण्यापूर्वी भात, नाचणी, हरभरा अशी पारंपारिक पिके घेत होता. तेलपंप/एच.डी.पी.ई. पाईप्स या योजनेचा लाभ घेतल्यानंतर पारंपरिक पिकांव्यतिरिक्त गहू, फरस बी व भाजीपाला अशी पिके घेत असल्याचे दिसून येते. शासनाने लाभार्थ्यांना दिलेल्या योजनेनंतर विविध पिके घेण्यामध्ये लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून येते.

लाभार्थ्यांकडे उपलब्ध असलेल्या सिंचन स्त्रोतांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

(संख्या)

| अ. क्र. | प्रकल्प | सिंचन स्त्रोत उपलब्ध लाभार्थी संख्या | सिंचनाची साधने | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विहीर | नदी | नाला | पाझर तलाव | कॅनॉल | इतर | |
| १ | घोडेगाव | ४५ | २२ | ०६ | १० | ०५ | ०० | ०२ | ४५ |
| २ | देवरी | ५४ | ३५ | ०३ | १३ | ०३ | ०० | ०० | ५४ |
| ३ | नागपूर | ४८ | ३६ | ०२ | ०५ | ०५ | ०० | ०० | ४८ |
| ४ | किनवट | ४३ | ३२ | ०१ | ०९ | ०० | ०० | ०१ | ४३ |
| ५ | पांढरकवडा | ४१ | २१ | ०१ | १६ | ०३ | ०० | ०० | ४१ |
| ६ | शहापूर | २७ | ०८ | ०८ | ११ | ०० | ०० | ०० | २७ |
| ७ | डहाणू | ३६ | १९ | १५ | ०१ | ०० | ०१ | ०० | ३६ |
| ८ | नाशिक | ४१ | ०७ | २३ | ०२ | ०९ | ०० | ०० | ४१ |
| ९ | कळवण | ४७ | २६ | ०३ | १८ | ०० | ०० | ०० | ४७ |
| १० | राजूर | ४३ | ३० | ०४ | ०९ | ०० | ०० | ०० | ४३ |
| | एकूण | ४२५ | २३६ | ६६ | ९४ | २५ | १ | ३ | ४२५ |

एकूण ४२५ लाभार्थ्यांपैकी २३६ लाभार्थ्यांकडे स्वत:च्या मालकीच्या विहिरी असून उर्वरित १८९ लाभार्थींपैकी ६६ लाभार्थी नदी, ९४ लाभार्थी नाला, २५ लाभार्थी पाझर तलाव, ०१ लाभार्थी कॅनाल व ३ लाभार्थी ओढा व साचलेले पाणी यावर अवलंबून असल्याचे दिसून येते.



जिल्हानिहाय उत्पन्न माहिती खालीलप्रमाणे आहे :--

| अ. क्र. | जिल्हा | उत्पन्न | | | | | | | | | | | | एकूण लाभार्थी (संख्या) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रु. १०,००० चे आतील | | रु. १०,००१ ते रु. २०,००० | | रु. २०,००१ ते रु. ३०,००० | | रु. ३०,००१ ते रु. ४०,००० | | रु. ४०,००१ ते रु. ५०,००० | | रु. ५०,००१ ते रु. ६०,००० चे पुढील | | |
| | | लाभापूर्वी | लाभानंतर | लाभापूर्वी | लाभानंतर | लाभापूर्वी | लाभानंतर | लाभापूर्वी | लाभानंतर | लाभापूर्वी | लाभानंतर | लाभापूर्वी | लाभानंतर | |
| १ | पुणे | १० | ०० | २५ | १६ | ०९ | २० | ०१ | ०५ | ०० | ०३ | ०० | ०१ | ४५ |
| २ | अहमदनगर | १९ | ०४ | १९ | २० | ०४ | १७ | ०१ | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ४३ |
| ३ | गोंदिया | २० | १५ | ३० | २८ | ०४ | ११ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ५४ |
| ४ | नागपूर | ०३ | ०२ | ३२ | ०६ | ११ | २४ | ०१ | १२ | ०१ | ०४ | ०० | ०० | ४८ |
| ५ | नांदेड | ०७ | ०० | १४ | ०५ | २० | १७ | ०२ | १० | ०० | ०५ | ०० | ०६ | ४३ |
| ६ | यवतमाळ | ०९ | ०० | ११ | १० | १६ | १२ | ०२ | ०९ | ०१ | ०२ | ०२ | ०८ | ४१ |
| ७ | ठाणे | १२ | ०३ | ३८ | २३ | १० | २८ | ०० | ०६ | ०० | ०० | ०३ | ०३ | ६३ |
| ८ | नाशिक | ०० | ०० | ६४ | १४ | २२ | ६२ | ०१ | ०९ | ०१ | ०२ | ०० | ०१ | ८८ |
| | एकूण | ८० | २४ | २३३ | १२२ | ९६ | १९१ | ८ | ५३ | ३ | १६ | ५ | १९ | ४२५ |

वर निर्देशित केलेल्या तक्त्याचे अवलोकन केले असता,

(अ) लाभापूर्वी रु. १०,०००/- आतील एकूण ८० लाभार्थी होते. या ८० लाभार्थ्यांपैकी लाभानंतर रु. १०,०००/- च्या आतील फक्त २४ लाभार्थी असल्याचे दिसून येते. म्हणजेच लाभानंतर ५६ लाभार्थ्यांचा आर्थिक स्तर उंचावल्याचे दिसून आले आहे.

(ब) रु. १०,०००/- ते रु. २०,०००/- या टप्यामध्ये लाभापूर्वी एकूण २३३ लाभार्थी होते. लाभानंतर १२२ लाभार्थी राहिलेत. म्हणजेच लाभानंतर १११ लाभार्थींचा आर्थिक स्तर उंचावल्याचे दिसून येते.

(क) रु. २०,००१/- ते रु. ३०,०००/- या टप्यामध्ये लाभापूर्वी ९६ लाभार्थी होते मात्र लाभानंतर १९१ लाभार्थी

(ड) रु. ३०,००१ ते रु. ४०,०००/- या टप्यामध्ये लाभापूर्वी ८ व लाभानंतर ५३ लाभार्थी

(इ) रु. ४०,००१ ते रु.५०,०००/- या टप्यामध्ये लाभापूर्वी ३ व लाभानंतर १६

(ई) रु. ५०,००१ ते रु.६०,०००/- या टप्यामध्ये लाभापूर्वी ५ व लाभानंतर १९ लाभार्थी.

वरीलप्रमाणे क ते ई चे अवलोकन केले असता लाभापूर्वीच्या लाभार्थ्यांची संख्या घटत जाऊन लाभानंतर संख्येत वाढ झाल्याचे दिसून येते. वरील सर्व बाबींचे अवलोकन केले असता, तेलपंपपुरवठा योजना व एच.डी.पी.ई. पाईपपुरवठा या शासकीय योजनेचा लाभ घेतल्यानंतर त्यांचे उत्पन्नात वाढ झाल्याने रु. १०,००१/- ते रु. २०,०००/-, रु.२०,००१ ते रु. ३०,०००/- , उत्पन्नवाढीमुळे या गटातील लाभार्थ्यांची संख्या कमी होवून वाढीव उत्पन्न गटात समाविष्ट झाली आहे. त्यामुळे वाढीव उत्पन्न गटातील लाभार्थ्यांची संख्येत वाढ झाली आहे.

अनुसूचित जमातीचे लोक हे दऱ्या-डोंगरामध्ये वास्तव्यास असतात. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय असून या व्यतिरिक्त जंगलातून मध गोळा करणे, हिरडा गोळा करणे इत्यादी या सर्वांवर ते उपजीविका चालवत असतात. त्यांची शेती ही पावसाळ्यातील पाण्यावर अवलंबून असल्याने आवश्यक त्या प्रमाणात शेतीतून उत्पादन अत्यल्प असते. त्यामुळे शेती करण्यासाठी आवश्यक असलेले तेलपंप या बाबी त्यांना खरेदी करणे अशक्य असते. ही बाब लक्षात घेऊन शासनाने अनुसूचित जमातीच्या लोकांचे शेतीचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने तसेच त्यांची आर्थिक उन्नती घडवून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनामार्फत अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांपैकी ही एक योजना असून वरील तक्त्याचे अवलोकन केले असता त्यांचे लाभापूर्वी असलेले उत्पन्न व शासनाने तेलपंप योजनेचे लाभ दिल्यानंतर असलेले उत्पन्नाचे अवलोकन केले असता लाभानंतर त्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये निश्चितपणे सुधारणा झाल्याचे दिसून येते.



## प्रकरण - ४

## निकष

**वीजपंप / तेलपंपपुरवठा :-**

आदिवासी शेतकऱ्यांना त्यांचा शेतविकास किफायतशीरपणे होण्याच्या दृष्टीने उपलब्ध असलेल्या साधनांचा व ऊर्जेचा पुरेपूर उपयोग करुन त्याद्वारे जास्तीत जास्त जमीन ओलीताखाली आणून आदिवासींचा आर्थिक विकास साधण्याच्या हेतूने त्यांना १०० टक्के अनुदानावर वीजपंप / तेलपंप पुरविण्याची योजना शासनाकडून सन १९७३-७४ पासून राबविण्यात येत आहे.

**योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्रतेच्या अटी खालील प्रमाणे आहेत :-**

(१) राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्र व आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्र यातील ज्या आदिवासी शेतकऱ्याकडे किमान ६० आर (दीड एकर) आणि कमाल ६ हेक्टर ४० आर (१६ एकर) इतकी लागवडीयोग्य जमीन उपलब्ध आहे, असे आदिवासी शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

(२) आदिवासी शेतकऱ्यांना पंप मंजूर करताना त्यांच्या शेतातील पाण्याचे साधन असलेल्या विहीर / नाल्यास कमीत कमी सहा महीने पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

(३) आदिवासी लाभार्थ्यांच्या विहिरीस किंवा पाण्याचे स्रोत असलेल्या नदी - नाल्यास पुरेसे पाणी उपलब्ध आहे, याबाबत खालील यंत्रणेची परवानगी / दाखला आवश्यक आहे.

(अ) नाल्याचे पाणी घ्यावयाचे असल्यास तहसीलदारांची परवानगी घ्यावी लागते.

(ब) अधिसूचित नाला असल्यास पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते.

(क) लाभार्थ्यांच्या विहिरीस किंवा पाण्याचे स्रोत असलेल्या नदी व वर नमूद केलेल्या उद्‌भवास पाण्याची उपलब्धता पुरेशी आहे या विषयी आदिवासी विकास विभागाच्या आदिवासी विकास निरीक्षकांनी प्रत्यक्ष पाहणी करुन दाखला द्यावा लागतो.

(४) आदिवासी शेतकरी स्वत: आपली जमीन कसत असला पाहीजे व तसे त्याने आपल्या प्रतिज्ञेवर नमूद करावे लागते.

(५) ६० आर पेक्षा कमी जमीन ज्यांच्या नावाने असेल अशा किंवा ३ लगतच्या जमीन धारकांनी एकत्रित येऊन करार लिहून दिला तर एकापेक्षा अधिक लाभधारक एकत्रितपणे या योजनेचा लाभ घेऊ शकतील. मात्र अशा एकत्रित आलेल्या शेतकऱ्यांची एकूण जमीन ६० आर पेक्षा जास्त असली पाहीजे.

(६) या योजनेखाली ज्या गावात / शेतात वीजपुरवठा केला जाऊ शकतो, त्या गावच्या शेतकऱ्यास फक्त वीजपंप पुरविला जातो व जेथे वीजपुरवठा केला जात नाही अथवा नजीकच्या भविष्यकाळात (३ वर्षे) केला जाण्याची शक्यता नाही, अशा ठिकाणी तेलपंप पुरविण्यात येतो.

**पी.व्ही.सी. / एच.डी.पी.ई. पाईपचा पुरवठा :-**

आदिवासींचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी त्यांना १०० टक्के सवलतीवर विद्युतपंप / तेलपंप पुरविले जातात. अशा लाभधारक आदिवासी शेतकऱ्यांना पी.व्ही.सी. पाईप ऐवजी एच.डी.पी.ई. पाईप (आय.एस.आय.मार्क) पुरवठा करणे ही योजना शासन पत्र क्र.पी.व्ही.सी.-२००८/प्र.क्र.२६६/का-५, दिनांक २४ डिसेंबर, २००८ अन्वये राबविण्यात येत आहे. एका लाभार्थीस ६ मीटर लांबीचे एच.डी.पी.ई. पाईप २१० मीटर मर्यादेत तसेच रुपये १५,०००/- चे कमाल मर्यादेत मंजूर केले जातात. आदिवासी शेतकरी हा स्वत: जमीन कसत असला पाहीजे.

## निष्कर्ष व शिफारशी

(१) शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी तेलपंप व एच.डी.पी.ई.पाईप्स या दोन्ही बाबींची गरज असते. मूल्यमापन पाहणीमध्ये असे दिसून आले आहे की, काही लाभार्थ्यांना फक्त तेलपंपाचाच लाभ दिला जातो तर काही लाभार्थ्यांना फक्त एच.डी.पी.ई. पाईप्स दिल्या जातात. तेलपंप पुरवठा योजना व एच.डी.पी.ई. पाईप्स पुरवठा योजना या दोन्ही योजना एकमेकांना पूरक असल्याने शासन निकषाप्रमाणे ज्या लाभार्थ्याकडे आवश्यक त्या प्रमाणात शेती आहे, अशा लाभार्थ्यांस फक्त तेलपंप न देता एच.डी.पी.ई. पाईप्स पुरवठा या योजनेचाही लाभ देणे आवश्यक आहे.

(२) अधिकाधिक लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देणे गरजेचे आहे जेणेकरून तेलपंप व एच.डी.पी.ई. पाईप्सचा वापर करून हे लाभार्थी आपल्या शेतीला जलसिंचनाच्या सुविधा देऊ शकतील व त्यामुळे त्यांच्या आर्थिक उत्पन्नात निश्चित वाढ होईल.


(३) बऱ्याच आदिवासी शेतकऱ्यांकडे विहिर असून विहिरीवर पंपसेट बसविलेला आहे. परंतु, काही वेळेस शेतीचे भिजणारे क्षेत्र पाण्याच्या स्रोतापासून लांब असेल तेव्हा विहिरीला भरपूर पाणी व पाणी उपसण्याचे साधन असून देखील जास्तीत जास्त प्रमाणात बागायती करणे शक्य होत नाही. अशावेळेस, आदिवासी शेतकऱ्यांना शेतीचे भिजणारे क्षेत्र व पाण्याचा स्रोत यांतील अंतर बघून जास्तीत जास्त पाईप देणे आवश्यक आहे. पाईपांची कमाल संख्या किती असावी, हा निर्णय प्रकल्प स्तरावर घेण्याबाबत शासन स्तरावर विचार व्हावा. जेणेकरुन, बागायती क्षेत्रात जास्तीत जास्त वाढ होईल.

(४) सध्या आदिवासी शेतकऱ्यांना प्रत्येकी जास्तीत जास्त रुपये १५,०००/- चे पाईप दिले जातात. परंतु, शेतीचे भिजणारे क्षेत्र व पाण्याचा स्रोत यातील अंतर जास्त असल्याने शेतीला पाणी देण्यावर मर्यादा पडतात. म्हणून आदिवासी शेतकऱ्यांना शेतीचे भिजणारे क्षेत्र व पाण्याचा स्रोत यांतील अंतर बघून जास्तीत जास्त पाईप ( कमाल मर्यादा - रुपये ३०,०००/- चे पाईप प्रती लाभार्थी ) देणे आवश्यक आहे.

(५) आदिवासी लाभार्थी शेतकरी हे अत्यंत दारिद्र्यात जीवन जगतात. त्यांना तेलपंपाचा पुरवठा केल्यानंतरही त्याच्या इंधनाचा म्हणजेच डिझेलचा होणारा खर्च त्यांना परवडत नाही. त्यामुळे शेतीच्या हंगामाच्या काळात म्हणजेच माहे नोव्हेंबर ते माहे जून या ८ महिन्यांच्या काळात प्रती लाभार्थी प्रती महिना क्षेत्रानुसार रुपये ६००/- इतके **इंधन अनुदान (Fuel Subsidy)** देण्यात यावे, जेणेकरून आदिवासी शेतकऱ्यांना तेलपंपाचा अधिकाधिक वापर करणे शक्य होईल.

(६) आदिवासी लाभार्थी शेतकऱ्यांना एकदा तेलपंप दिल्यानंतर तो तेलपंप नादुरुस्त झाल्यास किंवा बिघडल्यास त्याची दुरुस्ती करणे आर्थिदृष्ट्या फार अवघड जाते. याचा स्थानिक लोक व मोटार मॅकेनिक गैरफायदा घेतात व आदिवासी शेतकऱ्यांना लुबाडतात. त्यांची ही पिळवणूक टाळण्यासाठी आदिवासी समाजातील बेरोजगार युवकांना तेलपंप व विद्युतपंप संच दुरुस्तीचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे, जेणेकरून स्थानिक पातळीवरच तेलपंपाची दुरुस्ती होईल, बेरोजगार युवकांनाही रोजगार मिळेल व आदिवासी शेतकऱ्यांची पिळवणूकही टाळता येईल.

(७) आदिवासी लाभार्थी शेतकऱ्यांकडे भांडवलाची कमतरता असते. तसेच संपूर्ण आदिवासी लाभक्षेत्रामध्ये पाण्याची उपलब्धता असली तरी सिंचन योजना नसल्यामुळे पीक उत्पादनक्षमता कमी आहे. त्यासाठी उपसा जलसिंचन योजनेद्वारे १० ते १५ आदिवासींना या योजनेचा लाभ दिल्यास त्याचा फायदा सर्व आदिवासी लाभार्थींना मिळून उत्पन्नात भरीव वाढ होऊ शकेल.



## परिशिष्ट-अ

### शासन निर्णय व माहिती पत्रकाचा नमुना

दारिद्र्य रेषेखालील आदिवासी शेतकऱ्यांना
पी. व्ही. सी. पाईप ऐवजी एच. डी. पी. ई
पाईपचा पुरवठा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**आदिवासी विकास विभाग**

शासन निर्णय क्रमांक : पीव्हीसी-२००८/प्र.क्र.२६६/का.५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २४ डिसेंबर २००८

**वाचा** :(१) शासन निर्णय आ. वि. वि. क्र. पी. व्ही. सी. २००४/प्र.क्र. ५५/का-८, दिनांक २४-८-२००४.

(२) आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांचे पत्र क्र. विकास-२००७/पी.व्ही.सी. पाईप-०७-०८/प्र.क्र.४(०७)/का.-३ (१), दि. १९-६-२००७.

(३) शासन पत्र क्र. पी.व्ही.सी. २००४/प्र.क्र. ५५/का-८, दिनांक ४-१०-२००७ व दिनांक २५-१-२००८.

(४) कृषी संचालक (वि.प्र.), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांनी आयुक्त, आ.वि. नाशिक यांना लिहिलेले पत्र क्र. विधयो/विप्र-५/जकात कर माफी/४२१/०७, दि. ११ ऑक्टोबर २००७.

**प्रस्तावना** : आदिवासी शेतकऱ्यांचा आर्थिक दर्जा उंचावण्यासाठी १०० टक्के अनुदानावर विजपंप मंजूर केले जातात. या योजनेशी संलग्न योजना म्हणून आदिवासी शेतकऱ्यांचा पी. व्ही. सी. पाईप पुरवठा करणे ही योजना शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. पी.व्ही.सी. २००४/प्र.क्र.५५/का-८, दिनांक २४-८-२००४ अन्वये राबविण्यात येत आहे. सदर योजना अत्यंत प्रभावशाली असून आदिवासी शेतकऱ्यांना फायदेशीर ठरली आहे. परंतु, पी. व्ही. सी. पाईपपेक्षा एच. डी. पी. ई. पाईप वजनाला हलके, मजबूत व टिकावू असतात, एच. डी. पी. ई. सर्वसाधारणपणे अंदाजे २० वर्षे उपयोगात आणता येतात. एच. डी. पी. ई. पाईप लविचक असल्यामुळे ने-आण करताना तुकडे पडत नाहीत. तसेच पाईपवर वजनी वस्तूचा दाब पडल्यास तुटत नाहीत तर चेपतात, एच. डी. पी. ई. पाईपवर रासायनिक पदार्थांचा परिणाम होत नाही. असे निदर्शनास आल्याने पी. व्ही. सी. पाईपपेक्षा एच. डी. पी. ई. पाईपची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्या दिनांक १०-८-०७ च्या पत्रान्वये प्रस्ताव प्राप्त झाला होता त्यास अनुसरून दारिद्र्य रेषेखालील आदिवासी शेतकऱ्यांना पी. व्ही. सी. पाईपऐवजी एच. डी. पी. ई. पाईपचा पुरवठा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : दारिद्र्य रेषेखालील आदिवासी शेतकऱ्यांना पी. व्ही. सी. पाईपऐवजी एच. डी. पी. ई. पाईपचा पुरवठा करण्यास खालील अटीवर मंजुरी देण्यात येत आहे.

(१) या योजनेअंतर्गत ज्या आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप मंजूर करण्यात आले आहेत. त्यापैकी दारिद्र्यरेषेखालील आदिवासी शेतकऱ्यांना आता पी. व्ही. सी. पाईपऐवजी एच. डी. पी. ई. पाईपचा पुरवठा करण्यात यावा.

(२) एका लाभार्थ्यास ६ मीटर लांबीचे एच. डी. पी. ई. पाईप, २१० मीटर लांबीचे मर्यादेत तसेच रुपये १५,०००/- चे कमाल आर्थिक मर्यादेत मंजूर करावेत.

(३) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे एच. डी. पी. ई. पाईप व्यवस्थापकीय संचालक, एम. एस. एस. आय. डी. सी./महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचे किंवा तत्सम **दर करारान्वये खरेदी करून** पाईप पुरवठा करतील.

(४) पी.व्ही.सी. पाईपचा पुरवठा करणे या योजनेसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या तरतुदीमधून एच. डी. पी. ई. पाईपची खरेदी करण्यात यावी.

३. त्यामुळे यापुढे 'आदिवासी शेतकऱ्यांना पी. व्ही सी. पाईप पुरविणे' या योजनेस 'आदिवासी शेतकऱ्यांना एच. डी. पी. ई. पाईप' पुरविणे असे संबोधण्यात यावे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्र. ४३१/०७/व्यय-१४, दिनांक ३१-८-२००७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २००८१२२४१७४४४७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( पि. रा. भोसले )**
कार्यासन अधिकारी

प्रति,
आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक (२ प्रती).
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक.
अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/नागपूर/अमरावती.
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मुंबई.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
महालेखापाल (लेखापरीक्षण) (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, ५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मुंबई-३२.
वित्त विभाग (व्यय-१४), (अर्थसंकल्प-१९), मंत्रालय, मुंबई-३२.
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
कक्ष अधिकारी (का-७) आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव.
सर्व कार्यासने, आदिवासी विकास विभाग.
निवड नस्ती/का. ५.

आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप
पुरविण्याची योजना.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : इएमपी-१०९२/प्र.क्र.४२[९२]/का.५,
दिनांक : १६ जुलै १९९२.

**वाचा** :(१) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक एसटीडब्ल्यू-१०७३/६३४०/के, दिनांक २-११-१९७३.

(२) शासन परिपत्रक, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक एसटीडब्ल्यू-१०७३/६३४०/के, दिनांक ११-१२-१९७३.

(३) शासन शुद्धीपत्रक, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक एसटीडब्ल्यू-१०७३/६३४०/क, दिनांक २०-६-१९७४.

(४) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक एसटीडब्ल्यू-१०७६/४५६३३/का. २७, दिनांक १७-१-१९७७.

(५) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक इएमपी-१०८०/३९४४/ का-१६, दिनांक २७-२-१९८१.

(६) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक इएमपी-१०८०/४९०२/ का-१६, दिनांक ३०-३-१९८१.

(७) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक इएमपी-१०८१/१८४(३४)/ का-१६, दिनांक २८-५-१९८१.

(८) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक इएमपी-१०८२/७६८/ का-१६, दिनांक २१-५-१९८२.

(९) शासन परिपत्रक, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक इएमपी-१०८२/७६८/ का-१६, दिनांक २९-५-१९८२.

(१०) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक इएमपी-१०८२/४१३ (२१)/का-१६, दिनांक २९-५-१९८२.

(११) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक इएमपी-१०८४/(४६)/का-१६, दिनांक १७-५-१९८४.

(१२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक इएमपी-१०८६/५२४/प्र. क्र. १२१/का-९, दिनांक २०-५-१९८६.

(१३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक इएमपी-१०८३/१८६१/प्र. क्र. ३४/का-९, दिनांक २०-१२-१९८७.

(१४) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक विसआ-१०८७/११४/प्र. क्र. ७/का-९, दिनांक १५-२-१९८८.

(१५) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक इएमपी-१०८६/प्र. क्र.२०४/का-६, दिनांक ७-१२-१९८८.

(१६) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक टीडीसी-१०८९/प्र. क्र. २४२/का-६, दिनांक ३०-३-१९९०.

(१७) शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्रमांक इएमपी-१०९०/२०५८२/प्र. क्र.२९८/का-६, दिनांक २५-१०-१९९०.

(१८) शासन पत्र क्रमांक इएमपी-१०८९/१०२१८/प्र. क्र. २२८/का-६, दिनांक ३-१-१९९२.

---

**प्रस्तावना** : शेती हा आदिवासींचा प्रमुख व्यवसाय असून महाराष्ट्रातील ८० टक्के आदिवासी उपजिवीकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत. यातही बहुतेक अल्पभूधारक असून गौण प्रतीची पिके घेत असल्यामुळे त्यांचा शेती व्यवसाय किफायतशीर हात नाही. आदिवासींच्या आर्थिक उन्नतीसाठी शासन विविध योजना राबवित आहे. शेती व्यवसाय किफायतशीर होण्याच्या दृष्टीने उपलब्ध असलेल्या साधनांचा व ऊर्जेचा पुरेपूर उपयोग करून त्याद्वारे जास्तीत जास्त जमीन आलिताखाली आणून आदिवासींचा आर्थिक विकास साधण्याच्या हेतूने आदिवासी शेतकऱ्यांना अर्थसहाय्यावर वीजपंप संच पुरविण्याची योजना दिनांक २-११-१९७३ च्या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आली. अतिदुर्गम आदिवासी भागात विद्युत पुरवठा नसल्याने अशा भागातील काही आदिवासी शेतकऱ्यांना विद्युतपंप पुरविणे या योजनेचा लाभ घेता येत नव्हता. ही अडचण दूर करण्यासाठी शासनाने दिनांक १७-१-१९७७ च्या शासन निर्णयाद्वारे अशा भागातील आदिवासी शेतकऱ्यांना तेलपंप देण्याची योजना सुरू केली.

२. ही योजना राबवित असताना काही व्यावहारिक अडचणी शासनाच्या निदर्शनास आल्या असून त्यांचा विचार करून या योजनेत सुधारणा करणे क्रमप्राप्त झाले आहे. उदाहरणार्थ, या योजनेचा लाभ घेण्यासाठी आदिवासी शेतकऱ्यांकडे किमान ८० आर (२ एकर) जमीन असणे आवश्यक आहे. परंतु रोजगार हमी योजना, जीवनधारा योजना, जवाहर योजना या सारख्या योजनांखाली विहिरी बांधून देताना शासनाने किमान जमीन धारणा मर्यादा ६० आर (दीड एकर) एवढी विहित केली आहे. त्यामुळे ज्या आदिवासींकडे ६० आर जमीन आहे व ज्यांना वरील योजनांखाली विहीर बांधून मिळाली आहे किंवा ज्यांनी बांधली आहे त्यांना या विभागामार्फत राबविल्या जात असलेल्या वीजपंप/तेलपंप योजनेचा लाभ घेता येत नाही. अशा आदिवासी शेतकऱ्यांनासुद्धा या योजनेचा लाभ मिळवून देणे शक्य व्हावे म्हणून किमान जमीन धारणेची मर्यादा खाली आणणे आवश्यक आहे. तसेच पाण्याची उपलब्धता किंवा खोली पाहून ३/५ अश्वशक्तीपेक्षा जास्त अश्वशक्तीचे पंप मंजूर करण्यात यावेत ही सूचनाही शासनाच्या विचाराधीन होती. शिवाय मंजूर केल्याप्रमाणे पंप बसविले जात नाहीत किंवा विलंबाने बसविले जातात व बसविलेल्या पंपांना वीजपुरवठा केला जात नाही हेही शासनाच्या निदर्शनास आले आहे.

३. या सर्व बाबी लक्षात घेता या योजनेचे सुलभीकरण करून तिची सुधारणा करण्याचा व ती अधिक परिणामकारक करण्याचा विचार शासनाच्या मनात होता. १९९३ सालापासून राबविण्यात येत असलेल्या या योजनेच्या संदर्भात वेळोवेळी उपोद्घातात नमूद केल्याप्रमाणे विविध आदेश व सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे ही योजना राबवित असताना आलेल्या अडचणींचा विचार करून तसेच आतापावेतो देण्यात आलेल्या सूचना व आदेश एकत्रित करून सुधारित आदेश काढण्याची गरज निर्माण झालेली आहे.

**शासन निर्णय :--** या योजनेबाबत उपोद्घातात उल्लेख करण्यात आलेले आदेश व आतापावेतो देण्यात आलेल्या इतर सूचना व आदेशांचे अधिक्रमण करून शासन आदेश देत आहे की, "आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप पुरविण्याची योजना" यापुढे या शासन निर्णयास जोडलेल्या परिशिष्टानुसार व त्यात नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून राबविण्यात येईल.

.२. शासन पुढे असेही आदेश देत आहे की, वीजपंप व तेलपंप बसविण्याची व कार्यान्वित करण्याची सर्व जुनी व प्रलंबित प्रकरणे परिशिष्टांतील योजनेनुसार निकालात काढण्यात यावीत.

३. या योजनेवरील खर्च खाली नमूद करण्यात आलेल्या लेखाशीर्षाखाली करण्यात येणाऱ्या/आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा :--

२२२५--अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-जनजाती क्षेत्र उपयोजना--०२--अनुसूचित जमातीचे कल्याण--१०२ आर्थिक विकास (२) (अ) पंप संच बसविणे--४३--अर्थसहाय्य (ए) राज्य योजनांतर्गत योजना (२२२५ १४४६) व (सी विशेष केंद्रीय सहाय्य योजना (२२२५ १४५५) मागणी क्रमांक टी-७.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( अ. क. पडाय )**
सहायक सचिव

प्रति,

आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, आदिवासी विकास भवन, नाशिक.
अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, आदिवासी विकास भवन, नाशिक
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
सर्व प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सचिव, महाराष्ट्र राज्य, विद्युत मंडळ, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, मुंबई
महालेखापाल, मुंबई-१
महालेखापाल, नागपूर-२
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
सचिव, उद्योग, उर्जा आणि कामगार विभाग, मंत्रालय. मुंबई
सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्यव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
मंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव
राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव
उपमंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव
या विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती

## परिशिष्ट

आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप पुरविण्याची योजना :--

**(१) योजनेचे उद्दिष्ट**

१.१ शेती व्यवसाय किफायतशीर होण्याच्या दृष्टीने उपलब्ध असलेल्या साधनांचा व ऊर्जेचा पुरेपुर उपयोग करून त्याद्वारे आदिवासींची जास्तीत जास्त जमीन ओलीताखाली आणून आदिवासींची आर्थिक उन्नती साधणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राज्यातील आदिवासी शेतकऱ्यांना या योजनेतील अटीस अधीन राहून विद्युत पंप किंवा तेलपंप मंजूर करण्यात यावेत.

१.२ या योजनेखाली सर्वसाधारणपणे ३ किंवा ५ अश्वशक्तीचे वीजपंप/तेलपंप मंजूर करण्यात येतील.

१.३ तथापि, लाभार्थीची मागणी ५ पेक्षा जास्त अश्वशक्तीच्या पंपाची असल्यास भू-जल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या प्रमाणपत्राच्या आधारे आवश्यक त्या अश्वशक्तीच्या पंपाचा पुरवठा करण्यात येईल. यासाठी जो अतिरिक्त खर्च येईल तो या योजनेसाठी मंजूर करण्यात येणाऱ्या अनुदानातून भागविण्यात येईल.

**(२) योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्रतेच्या अटी :--**

२.१ राज्यातील आदिवासी उप योजना क्षेत्र व आदिवासी उप योजना बाह्य क्षेत्र यातील ज्या आदिवासी शेतकऱ्यांकडे किमान ६० आर (दीड एकर) आणि कमाल ६ हेक्टर ४० आर (१६ एकर) इतकी लागवडीयोग्य जमीन उपलब्ध आहे असे आदिवासी शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ शकतील.

२.२ आदिवासींची वस्ती डोंगराळ व पहाडी भागात असल्याने आणि तेथील जमिनीमध्ये उंच सखलपणा आणि उताराचा भाग असल्याने सर्वत्र बाराही महिने पाण्याची पातळी सारखी रहात नाही. ही परिस्थिती लक्षात घेऊन आदिवासी शेतकऱ्यांना पंप मंजूर करताना त्यांच्या शेतातील पाण्याचे साधन असलेल्या विहिरीस नदीस/नाल्यास कमीत कमी ६ महिने पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

२.३ सर्वसाधारणपणे जून ते सप्टेंबर या चार महिन्यात डोंगरी आदिवासी भागामध्ये भरपूर पाऊस पडतो व या कालावधीमध्ये आदिवासी भागातील विहिरी, नद्या/नाले पाण्याने तुडुंब भरलेल्या असतात. तेव्हा वर्षातील ६ महिने निश्चित करताना ऑगस्ट ते जानेवारी या ६ महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्यांच्या विहिरीस किंवा पाण्याचे स्त्रोत असलेल्या नदी नाल्यास पुरेसे पाणी उपलब्ध आहे असा भूजल सर्वेक्षण यंत्रणेचा दाखला मिळविणे आवश्यक आहे.

२.४ आदिवासी शेतकरी स्वत: आपली जमीन कशीत असला पाहिजे व तसे त्याने आपल्या अर्जात प्रतिज्ञेवर नमूद करावे. ज्या आदिवासी शेतकऱ्यांची जमीन इतरांकडे कसायला देण्यात आली असेल अशा आदिवासीला ह्या योजनेला लाभ मिळणार नाही.

२.५ ६० आर पेक्षा कमी जमीन ज्यांच्या नावाने असेल अशा २ किंवा ३ लगतच्या जमीन धारकांनी एकत्रित येऊन करार लिहून दिला तर एकापेक्षा अधिक लाभधारक एकत्रितपणे या योजनेचा लाभ घेऊ शकतील. मात्र अशा एकत्रित आलेल्या शेतकऱ्यांची एकूण जमीन ६० आर पेक्षा जास्त असली पाहिजे.

२.६ या योजनेखाली ज्या गावात/शेतात वीजपुरवठा केला जाऊ शकतो त्या गावच्या शेतकऱ्यांस फक्त वीजपंप पुरविला जावा व जेथे वीजपुरवठा केला जात नाही अथवा नजिकच्या भविष्यकाळात (तीन वर्षे) केला जाण्याची शक्यता नाही अशा ठिकाणी तेलपंप पुरविला जावा.

**(३) लाभार्थ्यांचा सहभाग :--**

३.१ या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या प्रत्येक आदिवासी शेतकऱ्यांनी त्यांना शासनातर्फे मंजूर करण्यात येणाऱ्या पंपाच्या किंमतीत आर्थिक सहभाग देणे आवश्यक आहे. आदिवासी शेतकऱ्यांनी त्यांना पंप मंजूर झाल्यावर आपल्या आर्थिक सहभागाची रक्कम संबंधित प्रकल्प अधिकारी यांच्याकडे भरणा करावी.

३.२ प्रत्येक पंपामागे ६० आर ते ४ हेक्टर (१० एकर पर्यंतच्या) जमीनधारक आदिवासी शेतकऱ्यांना रुपये २५०/ आणि ४ हेक्टरपेक्षा जास्त जमीन असणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना रुपये ५००/ लाभार्थीचा सहभाग म्हणून भरावे लागतील.

३.३ जेव्हा एकापेक्षा अधिक आदिवासी शेतकरी एकत्रित येऊन या योजनेचा लाभ घेऊ इच्छित असतील तेव्हा अशा लाभधारकांनी त्यांची एकत्रित आर्थिक सहभागाची रक्कम सम प्रमाणात भरावी लागेल.

**(४) लाभार्थ्यांची निवड :--**

४.१ मागील परिच्छेद २ मधील अटींची पूर्तता करणाऱ्या व परिच्छेद ३ मध्ये विहित केल्याप्रमाणे आर्थिक सहभाग तयार असणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांने या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडे विहित नमुन्यात अर्ज करावा.

४.२ त्याकरिता लागणाऱ्या अर्जाचे कोरे नमुने संबंधित एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात उपलब्ध करून देण्यात यावेत.

४.३ प्रकल्प अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेले अर्ज परिपूर्ण भरल्याची खात्री करून घेऊन अर्जाची खालील मुद्यांच्या व कागदपत्रांच्या अनुषंगाने छाननी करावी :--

(१) नमुन्यामध्ये अर्ज लिहिला आहे की नाही.

(२) ज्या गटात विहीर, नदी, नाला आहे त्याचा नकाशा सोबत जोडला आहे काय ?

(३) अे-१ फॉर्म सोबत जोडला आहे काय ?

(४) खाते उतारा सोबत जोडला आहे काय ?

४.४ परिपूर्ण अर्जदारांच्या संदर्भात प्रकल्प अधिकाऱ्यांनी संबंधित यंत्रणांकडून पुढील कागदपत्रांची पूर्तता करून घ्यावी.

(१) विद्युत पंपाकरिता महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचे आवश्यक सुसाध्यता प्रमाणपत्र.

(२) भूजल सर्वेक्षण यंत्रणेचे पुरेसे पाणीपुरवठ्याचे प्रमाणपत्र.

(३) नदी, नाला असल्यास पाणी उपसण्यासाठी संबंधित सक्षम अधिकाऱ्यांचे परवानगी पत्र.

४.५ वरीलप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता व आवश्यक असल्यास चौकशी/पडताळणी करून प्रकल्प अधिकारी सदर प्रकरण प्रकल्पस्तरीय निर्देश समितीपुढे मंजुरीसाठी सादर करतील. निर्देश समितीने मंजूर केलेली प्रकरणे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे विहित मुदतीत संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ यांच्याकडे पाठवतील व ती प्राप्त होताच प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ हे पंप बसविण्याची पुढील कार्यवाही करतील.

**(५) वीजपंप/तेलपंप मंजूर करण्यासाठी निर्देश समिती.**

५.१ शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक टीएसपी-न्यू.ब.यो./११९२/प्रक्र. ७/का-५, दिनांक १२ मे १९९२ नुसार न्यूक्लिअस बजेट योजनेंतर्गत योजना मंजूर करण्यासाठी अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली निर्देश समिती स्थापन करण्यात आली आहे. या निर्देश समितीचे इतर सदस्य खालीलप्रमाणे आहेत :--

(१) शासनाने नियुक्त केलेल्या नामनिर्देशित व्यक्ती : सदस्य

(२) संबंधित विभागाचे योजना प्रस्तावित करणारे किंवा अंमलबजावणी करणारे अधिकारी. : सदस्य

(३) प्रकल्प अधिकारी. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प : सदस्य सचिव

५.२ आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप पुरविण्याच्या योजनेंतर्गत वीजपंप/तेलपंप मंजूर करण्याचे काम वरील निर्देश समितीकडे सोपविण्यात येत आहे. निर्देश समिती आवश्यकतेनुसार भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा आणि सहाय्यक अभियंता. महाराष्ट्र राज्य वीज मंडळ यांना सदस्य म्हणून स्वीकृत करून घेईल.

५.३ निर्देश समितीचे वीजपंप/तेलपंप मंजूर करण्याचे आदेश मिळताच प्रकल्प अधिकाऱ्यांनी मंजूर यादी संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ यांना पुढील कार्यवाहीसाठी त्वरीत पाठवावी.

५.४ या समितीची बैठक आवश्यकता भासेल त्याप्रमाणे परंतु दोन महिन्यातून निदान एकदा तरी घेण्यात यावी. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत प्रकल्प अधिकारी बैठकीच्या अध्यक्षाचे काम पाहतील.

५.५ निर्देश समिती बैठकीचे कार्यवृत्त कायम स्वरूपाच्या नोंदवहीत नोंदण्यात यावे.

**(६) योजनेसाठी लागणारा निधी :--**

६.१ आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप पुरविण्याची योजना जिल्हास्तरीय असून योजनेसाठी लागणारा निधी त्या त्या जिल्हा नियोजन व विकास परिषदेमार्फत वार्षिक योजनेत ठरविण्यात येईल. सदरहू निधीची "मागासवर्गीयांचे कल्याण" या विकास शिर्षाखाली आदिवासी विकास विभागामार्फत वार्षिक अंदाजपत्रकात तरतूद करण्यात येईल.

६.२ वार्षिक अंदाजपत्रकात आर्थिक तरतूद मंजूर होताच पंप खरेदी करण्यासाठी करण्यात आलेली तरतूद शासनाकडून सर्व प्रकल्प अधिकाऱ्यांकडे थेट वाटप करून सुपूर्द करण्यात येईल. आदिवासी विकास आयुक्त, सर्व प्रकल्प अधिकारी त्या त्या वर्षाच्या नेमून दिलेल्या लक्ष्यानुसार ह्या रकमेचा योग्य रीतीने विनियोग करतात किंवा नाही याबाबत वेळोवेळी पाहणी करतील व योजनेखाली होणारा खर्च व सुपूर्द केलेल्या निधीचा योग्य विनियोग यावर नियंत्रण ठेवतील.

६.३ निर्देश समितीने मंजूर केलेल्या प्रकरणानुसार प्रकल्प अधिकारी वेळोवेळी संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ यांच्याकडे धनादेशाने लाभार्थ्याला पुरवावयाच्या वीजपंप/तेलपंपाची किंमत धनादेशाने अदा करतील.

६.४ आयुक्त, हे प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ यांना अंमलबजावणीचे एक वेळापत्रक ठरवून देतील. ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार पंप बसविण्याची व योजना कार्यान्वित करण्याची जबाबदारी प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ व पर्यायाने व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी विकास महामंडळ यांची राहील.

६.५ या योजनेसाठी वार्षिक योजनेत वर उल्लेख केलेल्या राज्य निधीच्या व्यतिरिक्त आवश्यक तरतूद विशेष केंद्रीय सहाय्यातूनही उपलब्ध करून देण्यात येईल.

(७) प्रकल्प क्षेत्रवार पंपाचे लक्ष्य :--

७.१ प्रकल्पक्षेत्रनिहाय पंप पुरविण्याचे लक्ष्य जिल्हा नियोजन व विकास परिषदेने निर्धारित केलेले नसल्यास तिने उपलब्ध करून दिलेल्या निधीच्या प्रमाणात असे लक्ष्य आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक हे ठरवतील आणि संबंधित सर्व विभागांना/अधिकाऱ्यांना आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच कळवतील.

७.२ विशेष केंद्रीय सहाय्याअंतर्गत उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीच्या संदर्भात आयुक्त, आदिवासी विकास हे प्रकल्प क्षेत्रिनहाय लक्ष्य निश्चित करतील.

**(८) सर्वसाधारण सूचना :--**

८.१ प्रत्येक प्रकल्प अधिकाऱ्याने वीजपंप/तेलपंप मंजुरीसाठी लागणाऱ्या अर्जाचा नमुना निश्चित करून त्यांच्या पुरेशा प्रती छापून घेऊन अर्जदाराच्या उपयोगासाठी आपल्या कार्यालयात उपलब्ध ठेवाव्यात.

८.२ प्रकल्प अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील गावाचे, संबंधित ग्रामसेवक आणि तलाठी यांच्या मदतीने सर्वेक्षण करून घेऊन पात्र लाभार्थ्यांची प्रकरणे तयार करून घ्यावीत. या कामी आदिवासी विकास निरीक्षक आणि आश्रम शाळांतील शिक्षक यांचीही मदत घेण्यात यावी.

८.३ ज्या आदिवासी शेतकऱ्यांच्या विहिरी जीवनधारा/जवाहर योजनेअंतर्गत खणलेल्या आहेत अशा शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप मंजूर करण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे.

८.४ जीवनधारा/जवाहर योजनेअंतर्गत खणलेल्या विहीरींच्या संदर्भात संबंधित कार्यकारी अभियंता यांनी त्या यशस्वी झाल्याचे प्रमाणित केले असल्यास अशा प्रकरणी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे पुन्हा प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही. मात्र अर्जदाराची मागणी ५ अश्वशक्तीपेक्षा जास्त क्षमतेच्या पंपाची असल्यास भूजल सर्वेक्षण यंत्रणेच्या प्रमाणपत्राची गरज आहे.

८.५ मागील परिच्छेद २.६ मध्ये काहीही नमूद केले असले तरी जेथे नाला, नदी, धरण या सारख्या स्रोतामधून पाणी उचलणारे शेतकरी तेलपंप एका जागेवरून दुसरीकडे हलविता येत असल्यामुळे आणि आदिवासी भागात विजेचा पुरवठा व दाब नियमित नसल्यामुळे वीजपंपाऐवजी तेलपंपाची मागणी करतात अशा प्रकारची अशी मागणी वैयक्तिक गुणवत्तेवर विचारात घेतली जावी.

८.६ शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक टीएसपी-न्यूबयो/११९२/प्र.क्र. ७/का-५, दिनांक १२ मे १९९२ अन्वये न्यूक्लिअस बजेट अंतर्गत प्रकल्प अधिकारी या योजनेच्या लाभार्थ्याला लागणाली पाईप पुरविण्याची योजना राबवू शकतात.

**(९) आदिवासी विकास महामंडळाची जबाबदारी :--**

९.१ आदिवासी विकास महामंडळाने प्रस्तुतच्या योजनेसाठी पंप खरेदी करताना निर्धारित लक्ष्यांकांच्या आधारे प्रादेशिक विभागवार दरकरार करावा व असा दरकरार करताना उच्च गुणवत्ता आणि दर्जा आणि वाजवी किंमत व सेवा या दुहेरी निकषाचे पालन करावे.

९.२ जेथे स्वत:च्या जबाबदारीवर आदिवासी शेतकरी पंप बसवावयास इच्छुक नसतील तेथेच कंत्राटदार नेमून सदरचे काम केले जावे. तथापि, कंत्राटदार निश्चित करताना तो छोट्या क्षेत्रासाठी जसे तालुका किंवा जास्तीत जास्त प्रकल्प क्षेत्रासाठी निश्चित केला जावा आणि तो आदिवासी विकास महामंडळाच्या एकूण प्रादेशिक क्षेत्रासाठी एकच खचितच नसावा. सदरच्या कंत्राटदाराला केवळ पंप बसविण्यासाठी आणि चाचणी अहवाल सादर करण्यासाठी जबाबदार न ठेवता पंप सुरू करण्यासाठीदेखील जबाबदार धरावे.

९.३ आदिवासी विकास महामंडळाने दर करार निश्चित करताना पंप पुरविणे आणि पंप बसविणे ही दोन्ही कामे एकाच एजन्सीकडे टर्नकी पध्दतीने द्यावी किंवा कसे याबाबतचा निर्णय महामंडळाने घ्यावा.

९.४ प्रकल्प अधिकारी यांच्याकडून मंजूर यादी प्राप्त होताच प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ यांनी संबंधित वीज मंडळाच्या कार्यालयातून फर्म कोटेशन घ्यावे व ते तत्काळ भरणा करावे. पंप बसविला जात असतानाच किंबहुना त्या अगोदरच वीज मंडळाने खांब उभारणी, तारा ओढणे इत्यादी प्राथमिक बाबी पूर्ण करावयाच्या आहेत. पंप बसविल्यानंतर लगेचच चाचणी अहवाल वीज मंडळास देणे, शेतकऱ्यांच्यावतीने वीज मंडळास करारनामा व इतर पूर्तता करून देणे इत्यादी बाबी प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ यांनी पार पाडावयाच्या आहेत. प्रकल्प अधिकारी, प्रादेशिक व्यवस्थापक व वीजमंडळाचे संबंधित अधिकारी यांनी संयुक्तरीत्या समन्वय साधून काम करावे जेणेकरून लवकरात लवकर पंप कार्यान्वित होऊ शकेल.

**(१०) प्रलंबित कामे पूर्ण करण्याची जबाबदारी :--**

१०.१ सदरहू योजना कार्यान्वित करण्याची जबाबदारी सन १९८०-८१ या वर्षापासून महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाकडे सोपविण्यात आलेली आहे. तथापि, वीजपंप देण्याची योजना १९७३-७४ या वर्षापासून आणि तेलपंप देण्याची योजना सन १९७६-७७ या वर्षापासून अंमलात आली आहे. म्हणून योजनेच्या सुरूवातीपासून (सन १९७३-७४) पंप बसविणे, वीजेची लाईन देणे, पंप सुरू करून देणे इत्यादी प्रलंबित कामे पूर्ण करण्याची जबाबदारी आदिवासी विकास महामंडळाची आहे. तेव्हा आदिवासी विकास महामंडळाने त्याप्रमाणे या योजनेबाबतची सर्व प्रलंबित कामे पूर्ण करण्याची कार्यवाही करावी आणि त्याबाबतचा तिमाही अहवाल आयुक्त, आदिवासी विकास यांना नियमितपणे सादर करावा.

**(११) योजनेच्या संदर्भात ठेवावयाचा अभिलेख :--**

११.१ प्रकल्प अधिकाऱ्यांनी नमुना "अ", "ब", व "क" मध्ये तर प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ यांनी नमुना "ब" मध्ये नोंदवही ठेवावी.

# प्रपत्र " अ "

(टिप :- ही नोंदवही वीजपंप / तेलपंप अर्ज प्राप्त नोंदवही)

(टिप :- ही नोंदवही प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यालयात ठेवण्यात यावी.)

| अ. क्र. | शेतकऱ्याचे नाव | गाव | तालुका | जिल्हा | अर्ज प्राप्ती दिनांक | जमीन हेक्टर आर. | पाण्याचे साधन | म. रा. वी. मं./भूजल सर्वेक्षण. तहसिलदार यांचेकडे प्रमाणपत्रासाठी पाठविलेला दिनांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | म. रा. वी. मं. | भूजल सर्वेक्षण | तहसिलदार |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |

| दाखला प्राप्ती तारीख | | | | | | निर्देश समितीच्या ज्या बैठकीत या प्रकरणांचा विचार झाला तिचा दिनांक | निर्देश समितीचे अभिप्राय | आर्थिक सहभाग भरणा करणेसाठी कळविलेली तारीख | आर्थिक सहभाग भरणा केलेला दिनांक व पावती क्रमांक | प्रकल्प अधिकाऱ्याचा मंजुरी दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भूजल | | म.रा.वी.मं. | | तहसिलदार | | | | | | | |
| योग्य | अयोग्य | योग्य | अयोग्य | योग्य | अयोग्य | | | | | | |
| १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |

## प्रपत्र " ब "

**वीजपंप / तेलपंप पुरवठा नोंदवही नमुना.** **पंपसंच मंजुरीनंतर ठेवावयाची नोंदवही**

**(टिप :- ही नोंदवही प्रकल्प अधिकारी आणि प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ यांच्या कार्यालयात ठेवणे)**

| अ. क्र. | लाभार्थ्याचे पूर्ण नाव व पत्ता | जात | सर्व्हे नंबर | एकूण जमीन | पाण्याचे साधन | वीजपंप/तेलपंप मंजुरी वर्ष | प्रकल्प अधिकाऱ्याचे आदेश क्रमांक व दिनांक | पंपसंच कंपनीचे नाव व पंप नंबर | पंप बसविल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

| पंप न बसविण्यास त्याची कारणे | वीजपंपाला वीजपुरवठा झाल्याचा दिनांक | पंप सुरू झाल्याचा दिनांक | पंपांची सद्य:स्थिती | | आदिवासी विकास निरीक्षक/सहायक प्रकल्प अधिकारी यांची स्थान भेटीची तारीख | शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पंप सुरू आहे काय | सुरू नसल्यास त्याची कारणे | | पंप देण्यापूर्वी | पंपसंच मिळाल्यानंतर | |
| ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |

## प्रपत्र "क"

**वीजपंप / तेलपंप लाभार्थ्यांची गाववार वर्णक्रमानुसार तपासणी सूची**

**(ह्या नोंदवहीतील नोंदी गाववार ठेवावयाची असल्याने प्रत्येक गावानंतर पुरेशी जागा भविष्यात येणाऱ्या नोंदीसाठी मोकळी सोडण्यात यावी. ही नोंदवही प्रकल्प अधिकाऱ्यांच्या कार्यालयात ठेवण्यात यावी.)**

| अ. क्र. | गावाचे नाव | लाभार्थ्यांचे नाव | लाभार्थ्यांच्या नोंदवही | | | | पंपसंच मंजुरीविषयक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | " अ " नुसार | | " ब " नुसार | | वर्ष | मंजुरी आदेशांचा क्रमांक व दिनांक | |
| | | | नोंद क्रमांक | पृष्ठ क्रमांक | नोंद क्रमांक | पृष्ठ क्रमांक | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

शासनातर्फे आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप व तेलपंपाचा पुरवठा करण्याची योजना.

कार्यबल समितीची (टास्क फोर्स कमिटी) सुधारित रचना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक : इएमपी-१०९२/प्र.क्र.५९ (९५)/का.२०,

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २ जानेवारी १९९६

**वाचा** : (१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक इएमपी-१०८९/प्र. २५५/का-६, दिनांक २६ डिसेंबर १९८९.

(२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक टीएसपी/न्युबयो-११९२/प्र. ७/का-५, दिनांक १२ मे १९९२.

(३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक इएमपी-१०९२/प्र. ४२/का-५, दिनांक १६ जुलै १९९२.

(४) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक इएमपी-१०९५/प्र. ४२/का-५, दिनांक १७ मे १९९५.

(५) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक इएमपी-१०९५/प्र. १४/का-६, दिनांक ३ जून १९९५.

**शासन निर्णय** : आदिवासी शेतकऱ्यांना त्यांचा शेती विकास किफायतशीरपणे होण्याच्या दृष्टीने उपलब्ध असलेल्या साधनांचा व ऊर्जेचा पुरेपूर उपयोग करून त्याद्वारे जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आणून आदिवासींचा आर्थिक विकास साधण्याच्या हेतूने त्यांना अर्थसाहाय्यवर वीजपंप/तेलपंप पुरविण्याची योजना शासनाकडून राबविण्यात येत आहे.

या योजनेखाली आदिवासी शेतकऱ्याचे अर्ज मागवून त्यांची तपासणी व छाननी करण्यासाठी व त्यातून योग्य लाभार्थींची निवड करण्यासाठी शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक टीएसपी/न्युबयो/११९२/प्र. ७/का-५, दिनांक १२ मे १९९२ नुसार न्युक्लिअस बजेट योजनांतर्गत योजना मंजूर करण्यासाठी अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली निर्देश समिती स्थापन करण्यात आली आहे. व त्याच्या इतर सदस्यांची शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक इएमपी-१०९२/प्र. ४२/का-५, दिनांक १६ जुलै १९९२ अन्वये नियुक्ती करण्यात आली आहे.

आता यावर पुर्नविचार करून आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप पुरवठा करण्याच्या योजनेसंदर्भात खाली नमूद केल्याप्रमाणे कार्यबल समिति (टास्क फोर्स कमिटी) गठीत करण्यात निर्णय घेतला आहे.

सदरहू समिती ही फक्त आदिवासी उपयोजना प्रकल्पांतर्गत येणाऱ्या तालुक्यांसाठी राहील.---

| | | |
|---|---|---|
| १) संबंधित तालुक्यातील आमदार | .. | अध्यक्ष |
| २) संबंधित तालुक्याचे तहसिलदार | .. | सदस्य |
| ३) संबंधित तालुक्याचे गट विकास अधिकारी | .. | सदस्य |
| ४) सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ | .. | सदस्य |
| ५) प्रादेशिक व्यवस्थापक / उपप्रादेशिक व्यवस्थापक आदिवासी विकास महामंडळ | .. | सदस्य |
| ६) उपअभियंता, लघुपाटबंधारे उपविभाग | .. | सदस्य |
| ७) प्रकल्प अधिकारी, एकात्मिकृत आदिवासी विकास प्रकल्प | .. | सदस्य सचिव |

आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील तालुक्यामध्ये सदर योजनेची अंमलबजावणी शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक टीएसपी-१०९५/प्र. १४/का-६, दिनांक ३ जून १९९५ अन्वये नेमलेल्या प्रकल्प समितीमार्फत करण्यात यावी.

सदरहू योजनेच्या अंमलबजावणीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तींचा पुर्नविचार करण्यात येत असून त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केल्यानुसार आहेत त्याप्रमाणे योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(प. दि. तेंडोलकर),**

कार्यासन अधिकारी.

प्रति,

आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक

अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर

व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी विकास महामंडळ, नाशिक

सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिकृत आदिवासी विकास प्रकल्प.

**(१) योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्रतेच्या अटी :--**

१.१ राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्र व आदिवासी उपयोजना वाटप क्षेत्र यातील ज्या आदिवासी शेतकऱ्यांकडे किमान ६० आर (दीड एकर) आणि कमाल ६ हेक्टर ४० आर (१६ एकर) इतकी लागवडीयोग्य जमीन उपलब्ध आहे असे आदिवासी शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ शकतील.

१.२ आदिवासींची वस्ती डोंगराळ व पहाडी भागात असल्याने आणि तेथील जमिनीमध्ये उंच सखलपणा आणि उताराचा भाग असल्याने सर्वत्र बाराही महिने पाण्याची पातळी सारखी राहात नाही. ही परिस्थिती लक्षात घेऊन आदिवासी शेतकऱ्यांना पंप मंजूर करताना त्यांच्या शेतातील पाण्याचे साधन असलेल्या विहिरीस/नदीस/नाल्यास कमीत कमी ६ महिने पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

१.३ सर्वसाधारणपणे जून ते सप्टेंबर या चार महिन्यात डोंगरी आदिवासी भागामध्ये भरपूर पाऊस पडतो व या कालावधीमध्ये आदिवासी भागातील विहिरी, नद्या/नाले पाण्याने तुडुंब भरलेल्या असतात. तेव्हा वर्षातील ६ महिने निश्चित करताना ऑगस्ट ते जानेवारी या ६ महिन्याच्या कालावधीत लाभार्थ्यांच्या विहिरीस किंवा पाण्याचे स्रोत असलेल्या नदी नाल्यास पुरेसे पाणी उपलब्ध आहे. याबाबत खालील यंत्रणेची परवानगी/दाखला आवश्यक आहे.

१) नाल्याचे पाणी घ्यावयाचे असल्यास तहसिलदारांची परवानगी घेण्यात यावी.

२) अधिसूचित नाला असल्यास पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्याची मंजुरी घ्यावी.

३) लाभार्थ्यांच्या विहिरीस किंवा पाण्याचे स्रोत असलेल्या नदी व उपरोक्त नमूद केलेल्या उद्‌भवनामध्ये पाण्याची उपलब्धता पुरेशी आहे याविषयी संबंधित आदिवासी विकास निरीक्षक यांनी प्रत्यक्ष पाहणी करून दाखला द्यावा.

१.४ आदिवासी शेतकरी स्वत: आपली जमीन कशीत असला पाहिजे व तसे त्याने आपल्या अर्जात प्रतिज्ञेवर नमूद करावे. ज्या आदिवासी शेतकऱ्यांची जमीन इतरांकडे कसायला देण्यात आली असेल अशा आदिवासीला ह्या योजनेचा लाभ मिळणार नाही.

१.५ ६० आर पेक्षा कमी जमीन ज्यांच्या नावाने असेल अशा किंवा ३ लगतच्या जमीनधारकांची एकत्रित घेऊन करार लिहून दिला तर एकापेक्षा अधिक लाभधारक एकत्रितपणे या योजनेचा लाभ घेऊ शकतील. मात्र अशा एकत्रित आलेल्या शेतकऱ्यांची एकूण जमीन ६० आर पेक्षा जास्त असली पाहिजे.

१.६ या योजनेखाली ज्या गावात/शेतात वीजपुरवठा केला जाऊ शकतो त्या गावच्या शेतकऱ्यास फक्त वीजपंप पुरविला जावा व जेथे वीजपुरवठा केला जात नाही अथवा नजीकच्या भविष्यकाळात (तीन वर्षे) केला जाण्याची शक्यता नाही अशा ठिकाणी तेलपंप पुरविला जावा.

**(२) लाभार्थ्यांचा सहभाग :--**

२.१ या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या प्रत्येक आदिवासी शेतकऱ्यांनी त्यांना शासनातर्फे मंजूर करण्यात येणाऱ्या पंपाच्या किंमतीत आर्थिक सहभाग देणे आवश्यक आहे. आदिवासी शेतकऱ्यांनी त्यांना पंप मंजूर झाल्यावर आपल्या आर्थिक सहभागाची रक्कम संबंधित प्रकल्प अधिकारी यांच्याकडे भरणा करावी.

२.२ प्रत्येक पंपामागे ६० आर ते ४ हेक्टर (१० एकर पर्यंतच्या) जमीनधारक आदिवासी शेतकऱ्यांना रुपये २५० आणि ४ हेक्टर पेक्षा जास्त जमीन असणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना रुपये ५०० लाभार्थ्यींचा सहभाग म्हणून भरावे लागतील.

२.३ जेव्हा एकापेक्षा अधिक आदिवासी शेतकरी एकत्रित येऊन या योजनेचा लाभ घेऊ इच्छित असतील तेव्हा अशा लाभधारकांनी त्यांची एकत्रित आर्थिक सहभागाची रक्कम समप्रमाणात भरावी लागेल.

**(३) लाभार्थ्यांची निवड :--**

३.१ मागील परिच्छेद २ मधील अटींची पूर्तता करणाऱ्या व परिच्छेद ३ मध्ये विहित केल्याप्रमाणे आर्थिक सहभाग तयार असणाऱ्या आदिवासी शेतकऱ्याने या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडे विहित नमुन्यात अर्ज करावा.

३.२ त्याकरिता लागणाऱ्या अर्जाचे कोरे नमुने संबंधित एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात उपलब्ध करून देण्यात यावेत.

३.३ प्रकल्प अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेले अर्ज परिपूर्ण भरल्याची खात्री करून घेऊन अर्जाची खालील मुद्द्यांच्या व कागदपत्रांच्या अनुषंगाने छाननी करावी.

१) नमुन्यामध्ये अर्ज लिहिला आहे की नाही ?

२) ज्या गटात विहीर, नदी, नाला आहे त्याचा नकाशा सोबत जोडला आहे काय ?

३) ए-१ फॉर्म सोबत जोडला आहे काय ?

४) खाते उतारा सोबत जोडला आहे काय ?

३.४ परिपूर्ण अर्जदारांच्या संदर्भात प्रकल्प अधिकाऱ्यांनी संबंधित यंत्रणांकडून पुढील कागदपत्रांची पूर्तता करून घ्यावी.

१) विद्युत पंपाकरिता महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचे आवश्यक सुसाध्यता प्रमाणपत्र.

२) भूजल सर्वेक्षण यंत्रणेचे पुरेसे पाणी पुरवठ्याचे प्रमाणपत्र .

३) नदी, नाला असल्यास पाणी उपसण्यासाठी संबंधित सक्षम अधिकाऱ्याचे परवानगी पत्र.

३.५ वरीलप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता व आवश्यक असल्यास चौकशी/पडताळणी करून प्रकल्प अधिकारी सदर प्रकरण कार्यबल समितीसमोर मंजुरीसाठी सादर करतील. कार्यबल समितीने मंजूर केलेली प्रकरणे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे विहित मुदतीत संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ यांच्याकडे पाठवतील व तो प्राप्त होताच प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ हे पंप बसविण्याची पुढील कार्यवाही करतील.

४.१ आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप पुरविण्याच्या योजनेंतर्गत वीजपंप/तेलपंप मंजूर करण्याचे काम कार्यबल समितीकडेस सोपविण्यात येत आहे. कार्यबल समिती आवश्यकतेनुसार भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांना सदस्य म्हणून स्वीकृत करून घेईल.

४.२ कार्यबल समितीचे वीजपंप/तेलपंप मंजूर करण्याचे आदेश मिळताच प्रकल्प अधिकाऱ्यांनी मंजूर यादी संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ यांना पुढील कार्यवाहीसाठी त्वरीत पाठवावी.

४.३ या समितीची बैठक आवश्यकता भासेल त्याप्रमाणे परंतु दोन महिन्यातून एकदा तरी घेण्यात यावी. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत प्रकल्प अधिकारी बैठकीच्या अध्यक्षांचे काम पाहतील.

४.४ कार्यबल समिती बैठकीचे कार्यवृत्त कायम स्वरूपाच्या नोंदवहीत नोंदवण्यात यावे.

**(५) योजनेसाठी लागणारा निधी :--**

५.१ आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप पुरविण्याची योजना जिल्हास्तरीय असून योजनेसाठी लागणारा निधी त्या त्या जिल्हा नियोजन व विकास परिषदेमार्फत वार्षिक योजनेत ठरविण्यात येईल. सदरहू निधीची " मागासवर्गीयांचे कल्याण " या विकास शिर्षाखाली आदिवासी विकास विभागामार्फत वार्षिक अंदाजपत्रकात तरतूद करण्यात येईल.

५.२ वार्षिक अंदाजपत्रकात आर्थिक तरतूद मंजूर होताच पंप खरेदी करण्यासाठी करण्यात आलेली तरतूद शासनाकडून सर्व प्रकल्प अधिकाऱ्यांकडे थेट वाटप करून सुपूर्द करण्यात येईल. आदिवासी विकास आयुक्त, सर्व प्रकल्प अधिकारी त्या त्या वर्षाच्या नेमून दिलेल्या लक्ष्यानुसार ह्या रकमेचा योग्य रितीने विनियोग करतात किंवा नाही याबाबत वेळोवेळी पाहणी करतील व योजनेखाली होणारा खर्च व सुपूर्द केलेल्या निधीचा योग्य विनियोग यावर नियंत्रण ठेवतील.

५.३ कार्यबल समितीने मंजूर केलेल्या प्रकरणानुसार प्रकल्प अधिकारी वेळोवेळी संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ यांच्याकडे धनादेशाने लाभार्थ्यांना पुरवावयाच्या वीजपंप/तेलपंपाची किंमत धनादेशाने अदा करतील.

५.४ आयुक्त, हे प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ यांना अंमलबजावणीचे एक वेळापत्रक ठरवून देतील. ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार पंप बसविण्याची व योजना कार्यान्वित करण्याची जबाबदारी प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ व पर्यायाने व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी विकास महामंडळ यांची राहील.

५.५ या योजनेसाठी वार्षिक योजनेतर वर उल्लेख केलेल्या राज्य निधीच्या व्यतिरिक्त आवश्यक तरतूद विशेष केंद्रीय सहाय्यातूनही उपलब्ध करून देण्यात येईल.

**(६) प्रकल्प क्षेत्रावर पंपाचे लक्ष्य :--**

६.१ प्रकल्पक्षेत्रनिहाय पंप पुरविण्याचे लक्ष्य जिल्हा नियोजन व विकास परिषदेने निर्धारित केलेले नसल्यास तिने उपलब्ध करून दिलेल्या निधीच्या प्रमाणात असे लक्ष्य आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक हे ठरवतील आणि संबंधित सर्व विभागांना/अधिकाऱ्यांना आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच कळवतील.

६.२ विशेष केंद्रीय साहाय्याअंतर्गत उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीच्या संदर्भात आयुक्त, आदिवासी विकास हे प्रकल्प क्षेत्रनिहाय लक्ष्य निश्चित करतील.

**(७) सर्वसाधारण सूचना :--**

७.१ प्रत्येक प्रकल्प अधिकाऱ्याने वीजपंप/तेलपंप मंजुरीसाठी लागणाऱ्या अर्जाचा नमुना निश्चित करून त्यांच्या पुरेशा प्रती छापून घेऊन अर्जदाराच्या उपयोगासाठी आपल्या कार्यालयात उपलब्ध ठेवाव्यात.

७.२ प्रकल्प अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील गावाचे, संबंधित ग्रामसेवक आणि तलाठी यांच्या मदतीने सर्वेक्षण करून घेऊन पात्र लाभार्थ्यांची प्रकरणे तयार करून घ्यावीत. या कामी आदिवासी विकास निरीक्षक आणि आश्रम शाळांतील शिक्षक यांची मदत घेण्यात यावी.

७.३ ज्या आदिवासी शेतकऱ्यांच्या विहिरी जीवनधारा/जवाहर योजनेअंतर्गत खणलेल्या आहेत अशा शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप मंजूर करण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे.

७.४ जीवनधारा/जवाहर योजनेअंतर्गत खणलेल्या विहिरींच्या संदर्भात संबंधित कार्यकारी अभियंता यांनी त्या यशस्वी झाल्याचे प्रमाणित केले असल्यास अशा प्रकारची भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे पुन्हा प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही. मात्र अर्जदाराची मागणी ५ अश्वशक्ती पेक्षा जास्त क्षमतेच्या पंपाची असल्यास भूजल सर्वेक्षण यंत्रणेच्या प्रमाणपत्राची गरज आहे.

७.५ मागील परिच्छेद २.६ मध्ये काहीही नमूद केले असले तरी जेथे नाला, नदी, धरण यासारख्या स्रोतामधून पाणी उचलणारे शेतकरी तेलपंप एका जागेवरून दुसरीकडे हलविता येत असल्यामुळे आणि आदिवासी भागात वीजेचा पुरवठा व दाब नियमित नसल्यामुळे वीजपंपाऐवजी तेलपंपाची मागणी करतात अशा प्रकरणी अशी मागणी वैयक्तिक गुणवत्तेवर विचारात घेतली जावी.

७.६ शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक टीएसपी/न्युबयो/११९२/प्र. क्र. ७/का-५, दिनांक १२ मे १९९२ अन्वये न्युक्लिअस बजेट अंतर्गत प्रकल्प अधिकारी या योजनेच्या लाभार्थ्याला लागणारी पाईप पुरविण्याची योजना राबवू शकतात.

**(८) आदिवासी विकास महामंडळाची जबाबदारी :--**

८.१ आदिवासी विकास महामंडळाने प्रस्तुतच्या योजनेसाठी पंप खरेदी करताना निर्धारित लक्ष्यांकांच्या आधारे प्रादेशिक विभागवार दरकरार करावा व असा दरकरार करताना उच्च गुणवत्ता आणि दर्जा आणि वाजवी किंमत व सेवा या दुहेरी निकषाचे पालन करावे.

८.२ जेथे स्वत:च्या जबाबदारीवर आदिवासी शेतकरी पंप बसवावयास इच्छुक नसतील तेथेच कंत्राटदार नेमून सदरचे काम केले जावे. तथापि, कंत्राटदार निश्चित करताना तो छोट्या क्षेत्रासाठी जसे तालुका किंवा जास्तीत जास्त प्रकल्प क्षेत्रासाठी निश्चित केला जावा आणि तो आदिवासी विकास महामंडळाच्या एकूण प्रादेशिक क्षेत्रासाठी एकच खचितच नसावा. सदरच्या कंत्राटदाराला केवळ पंप बसविण्यासाठी आणि चाचणी अहवाल सादर करण्यासाठी जबाबदार न ठेवता पंप सुरू करण्यासाठी देखील जबाबदार धरावे.

८.३ आदिवासी विकास महामंडळाने दर करार निश्चित करताना पंप पुरविणे आणि पंप बसविणे ही दोन्ही कामे एकाच एजन्सीकडे टर्नको पध्दतीने द्यावी किंवा कसे याबाबतचा निर्णय महामंडळाने घ्यावा.

८.४ प्रकल्प अधिकारी यांच्याकडून मंजूर यादी प्राप्त होताच प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ यांनी संबंधित वीज मंडळाच्या कार्यालयापासून फर्म कोटेशन घ्यावे व ते तात्काळ भरणा करावे. पंप बसविला जात असतानाच, किंबहुना त्या अगोदरच वीज मंडळाने खांब उभारणी, तारा ओढणे इ. प्राथमिक बाबी पूर्ण करावयाच्या आहेत. पंप बसविल्यानंतर लगेचच चाचणी अहवाल वीज मंडळास देणे, शेतकऱ्यांच्या वतीने वीज मंडळास करारनामा व इतर पूर्तता करून देणे इत्यादी बाबी प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ यांनी पार पाडावयाच्या आहेत. प्रकल्प अधिकारी, प्रादेशिक व्यवस्थापक, व वीज मंडळाचे संबंधित अधिकारी यांनी संयुक्तरीत्या समन्वय साधून काम करावे जेणेकरून लवकरात लवकर पंप कार्यान्वित होऊ शकेल.

**(९) प्रलंबित कामे पूर्ण करण्याची जबाबदारी :--**

९.१ सदरहू योजना कार्यान्वित करण्याची जबाबदारी सन १९८०-८१ या वर्षापासून महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाकडे सोपविण्यात आलेली आहे. तथापि, वीजपंप देण्याची योजना १९७३-७४ या वर्षापासून आणि तेलपंप देण्याची योजना सन १९७६-७७ या वर्षापासून अंमलात आली आहे. म्हणून योजनेच्या सुरुवातीपासून (सन १९७३-७४) पंप बसविणे, विजेची लाईन देणे, पंप सुरू करून देणे इ. प्रलंबित कामे पूर्ण करण्याची जबाबदारी आदिवासी विकास महामंडळाची आहे. तेव्हा आदिवासी विकास महामंडळाने त्याप्रमाणे या योजनेबाबतची सर्व प्रलंबित कामे पूर्ण करण्याची कार्यवाही करावी आणि त्याबाबतचा तिमाही अहवाल आयुक्त, आदिवासी विकास यांना नियमितपणे सादर करावा.

**(१०) योजनेच्या संदर्भात ठेवावयाचा अभिलेख :--**

१०.१ प्रकल्प अधिकाऱ्यांनी नमुना " अ ", " ब " व " क " मध्ये तर प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ यांनी नमुना " अ " मध्ये नोंदवही ठेवावी.

## प्रपत्र "अ"

**टीप :- ही नोंदवही वीजपंप / तेलपंप अर्ज प्राप्त नोंदवही**

**टीप :- ही नोंदवही प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यालयात ठेवण्यात यावी.**

| अ. क्र. | शेतकऱ्याचे नाव | गाव | तालुका | जिल्हा | अर्ज प्राप्ती दिनांक | जमीन हेक्टर . आर | पाण्याचे साधन | म. रा. वि. मं./भूजल सर्वेक्षण. तहसिलदार यांचेकडे प्रमाणपत्रासाठी पाठविलेला दिनांक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | म. रा. वि. मं. | भूजल सर्वेक्षण | तहसिलदार |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |

| दाखला प्राप्ती तारीख | | | | | | कार्यबल समितीच्या ज्या बैठकीत या प्रकरणांचा विचार झाला तिचा दिनांक | कार्यबल समितीचे अभिप्राय | आर्थिक सहभाग भरणा करणेसाठी कळविलेली तारीख | आर्थिक सहभाग भरणा केलेला दिनांक व पावती क्रमांक | प्रकल्प अधिकाऱ्याचा मंजुरी दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भूजल | | म.रा.वि.मं. | | तहसिलदार | | | | | | | |
| योग्य | अयोग्य | योग्य | अयोग्य | योग्य | अयोग्य | | | | | | |
| १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |

प्रपत्र " ब "

वीजपंप / तेलपंप पुरवठा नोंदवही नमुना

पंपसंच मंजुरीनंतर ठेवावयाची नोंदवही

**टीप :- ही नोंदवही प्रकल्प अधिकारी आणि प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ यांच्या कार्यालयात ठेवणे.**

| अ. क्र. | लाभार्थ्यांचे पूर्ण नाव व पत्ता | जात | सर्व्हे नंबर | एकूण | पाण्याचे साधन | वीजपंप/तेलपंप मंजुरी वर्ष | प्रकल्प अधिकाऱ्याचे आदेश क्रमांक व दिनांक | पंपसंच कंपनीचे नाव व पंप नंबर | पंप बसविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

| पंप न बसविल्यास त्याची कारणे | वीजपंपाला वीजपुरवठा झाल्याचा दिनांक | पंप सुरू झाल्याचा दिनांक | पंपांची सद्य:स्थिती | | आदिवासी विकास निरीक्षक/सहायक प्रकल्प अधिकारी यांची स्थान भेटीची तारीख | शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पंप सुरू आहे काय ? | सुरू नसल्यास त्याची कारणे | | पंप देण्यापूर्वी | पंपसंच मिळाल्यानंतर | |
| ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |

## प्रपत्र "क"

**वीजपंप / तेलपंप लाभार्थ्यांची गाववार वर्णक्रमानुसार तपासणी सूची**

**(ह्या नोंदवहीतील नोंदी गाववार ठेवावयाची असल्याने प्रत्येक गावानंतर पुरेशी जागा भविष्यात येणाऱ्या नोंदीसाठी मोकळी सोडण्यात यावी. ही नोंदवही प्रकल्प अधिकाऱ्यांच्या कार्यालयात ठेवण्यात यावी.)**

| अ. क्र. | गावाचे नाव | लाभार्थ्यांचे नाव | लाभार्थ्यांच्या नोंदवही | | | | पंपसंच मंजुरीविषयक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | " अ " नुसार | | " ब " नुसार | | वर्ष | मंजुरी आदेशाचा क्रमांक व दिनांक | |
| | | | नोंद क्रमांक | पृष्ठ क्रमांक | नोंद क्रमांक | पृष्ठ क्रमांक | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

# आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
# महाराष्ट्र राज्य, पुणे

## आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप व पी.व्ही.सी./एच.डी.पी.ई. पाईप्स पुरवठ्यामुळे त्यांचे उत्पन्नात वाढ झाली किंवा नाही याबाबतचे मूल्यमापन

## कुटुंब पत्रक

प्रकल्प कार्यालय :-

जिल्हा : तालुका :

**१) लाभधारकाची ओळख**

(१) गावाचे नाव : (२) पाडा :

(३) लाभधारकाचे नाव : लिंग : स्त्री / पु. वय :

(४) शिक्षण : (५) अनु. जमातीचे नाव :

(६) लाभधारक लाभ मिळणेपूर्वी दारिद्र्यरेषेखाली होता काय ? होय / नाही

(७) असल्यास दारिद्र्यरेषेचा क्रमांक :

(८) लाभ मिळालेल्या योजनेचे नाव : वीजपंप / तेलपंप / एचडीईपी पाईप्स

(९) लाभ मंजूर केल्याचे वर्ष :

(१०) प्रत्यक्ष लाभ मिळाल्याचे वर्ष :

(११) **अ) लाभ मिळण्यापूर्वी कुटुंब प्रमुखाचा मुख्य व्यवसाय :-** शेती / शेतमजुरी / मजुरी / नोकरी / व्यवसाय-दुग्धव्यवसाय / मासेमारी / गवत विकणे / लाकूडफाटा विक्री.

**ब) कुटुंब प्रमुखाचा दुय्यम व्यवसाय :-**

**(१२) लाभधारकाकडे असलेल्या शेतजमिनीचा व त्यातून उत्पन्नाचा तपशिल :-**

| अ. क्र. | बाब | मालकीची हे. | आर | खंडाची हे. | आर | जंगल खात्याची हे. | आर | इतर हे. | आर | एकूण हे. | आर | उत्पन्न रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिरायत | | | | | | | | | | | |
| २ | बागायत | | | | | | | | | | | |

**(१३) लाभ मिळाल्यानंतर शेतजमिनीचा तपशिल व त्यातून तपशिल :-**

| अ. क्र. | बाब | मालकीची हे. | आर | खंडाची हे. | आर | जंगल खात्याची हे. | आर | इतर हे. | आर | एकूण हे. | आर | उत्पन्न रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिरायत | | | | | | | | | | | |
| २ | बागायत | | | | | | | | | | | |

**(१४) लाभधारकाकडे असलेले पशुधन :-**

| अ. क्र. | बाब | गाई | | म्हैस | | रेडा | | शेळ्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अगोदर | लाभ मिळाल्यानंतर | अगोदर | लाभ मिळाल्यानंतर | अगोदर | लाभ मिळाल्यानंतर | अगोदर | लाभ मिळाल्यानंतर |
| १ | दुभती जनावरे | | | | | | | | |
| २ | भाकड जनावरे | | | | | | | | |
| ३ | लहान जनावरे | | | | | | | | |

| अ. क्र. | बाब | कोंबड्या | | इतर | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अगोदर | लाभ मिळाल्यानंतर | अगोदर | लाभ मिळाल्यानंतर | अगोदर | लाभ मिळाल्यानंतर |
| १ | दुभती जनावरे | | | | | | |
| २ | भाकड जनावरे | | | | | | |
| ३ | लहान जनावरे | | | | | | |

अगोदर लाभानंतर

**(१४) (अ) एकूण दूधापासून वार्षिक उत्पन्न** रुपये

**(ब) एकूण शेळी / शेळीचे बोकड विकून वाढलेले वार्षिक उत्पन्न** रुपये

**(१५) लाभधारक कुटुंब रहात असलेल्या घराची स्थिती :-** ( ✓ खूण करा)

| अ. क्र. | घराचा प्रकार | अगोदर | लाभानंतर |
|---|---|---|---|
| १ | झोपडी | | |
| २ | मंगळूरी कौलाची झोपडी | | |
| ३ | कौलाची झोपडी | | |
| ४ | पत्र्याची झोपडी | | |
| ५ | पत्र्याचे घर | | |
| ६ | आर.सी.सी. मध्ये बांधलेले घर | | |
| ७ | शासनाचे घरकुल | | |

**(१६) उपलब्ध एकूण जिरायत जमीन हे. आर.**

शेत जमिनीत घेण्यात येणारी पिके : ( ✓ खूण करा)

| अ. क्र. | पिकाचा प्रकार | अगोदर | लाभानंतर |
|---|---|---|---|
| १ | भात | | |
| २ | गहू | | |
| ३ | हरभरा | | |
| ४ | नाचणी / नागली | | |
| ५ | सावा | | |
| ६ | कडधान्ये | | |
| ७ | ज्वारी | | |
| ८ | तेलबिया | | |
| ९ | इतर | | |

**(१७) लाभधारकाचे लाभ मिळण्यापूर्वीचे एकूण वार्षिक उत्पन्न (अ. क्र. १२, १४) :** रुपये

**(१८) लाभ मिळाल्यानंतर लाभधारकाचे एकूण वार्षिक उत्पन्न (अ. क्र. १३, १४) :** रुपये

**(१९) अ) तेलपंप / वीजपंप**

(१) भेटीच्या दिवशी तेलपंप / वीजपंप उपलब्ध होते काय ? : होय / नाही

(२) तेलपंप / वीजपंप उपलब्ध नसल्यास त्याची कारणे

(३) तेलपंप / वीजपंप केव्हा मिळाला ?

(४) सिंचनाचा स्रोत काय आहे ? : विहीर / नदी / नाला / इतर

(५) सदर स्रोतामधून पाणी किती महिने उपलब्ध होते ? :
(पावसाळा हंगाम सोडून)

(६) सदरच्या स्रोतामुळे किती जमीन ओलिताखाली आली ? :

(७) पिके भिजविण्यासाठी ठिबकसंच / स्प्रिंकलरचा वापर केला जातो काय ? : होय / नाही. ठिबक / स्प्रिंकलर

(८) तेलपंप / वीजपंप इंधन / वीजबिलावर होणारा दरमहा खर्च : रुपये

(९) परिक्षणाबाबतची माहिती

(१०) लाभार्थीचे अभिप्राय :

(माहिती देणार / लाभार्थीची सही / अंगठा)

नाव :

प्रगणकाचे नाव व हुद्दा :-

**(१९) ब) एच.डी.पी.ई. पाईप्सचा पुरवठा**

(१) लाभार्थीची एकूण जमीन किती आहे ? : हे. आर

(२) पैकी बागायती जमीन किती आहे ? : हे. आर

(३) सिंचनाची सोय काय आहे ? : हे. आर

(४) पाण्याच्या पाईप्स किती मिळाल्या ? : संख्या

(५) पाण्याच्या पाईप्स केव्हा मिळाल्या ? :

(६) भेटीच्या वेळी पाईप्स उपलब्ध होत्या काय ? : होय / नाही

(७) भेटीच्या वेळी पाईप्स मोकळ्या होत्या की जमिनीत पुरलेल्या होत्या ? :

(८) सदर पाईप्स मिळणेपूर्वी किती क्षेत्र भिजत होते ? : हे. आर

(९) पाईप्स मिळाल्यानंतर किती क्षेत्र ओलिताखाली आले ? : हे. आर

(१०) पिके भिजविण्यासाठी ठिबकसंच / स्प्रिंकलरचा वापर केला जातो काय ? : होय / नाही--ठिबक / स्प्रिंकलर

(१०) लाभार्थीचे अभिप्राय :

(माहिती देणार / लाभार्थीची सही / अंगठा)

नाव :

प्रगणकाचे नाव व हुद्दा :-

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-६.